# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२४

-----------------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०१ जुलै, २०२४ / आषाढ १०, १९४६ (शके)**

**(१) वैद्यकीय शिक्षण, विशेष सहाय्य मंत्री**
**(२) ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री**
**(३) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**
**(४) कामगार मंत्री**
**(५) उद्योग मंत्री**
**(६) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(७) महिला व बालविकास मंत्री**
**(८) क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री**
**(९) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

-----------------------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ४३**

-----------------------------------------------------

## आंतरराष्ट्रीय आणि आशियाई स्तरावर पुरस्कार प्राप्त खेळाडूंना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत

**(१) * २३८७४ श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील क्रीडा विभागात थेट नियुक्तीकरीता शासनाने आंतरराष्ट्रीय व आशियाई स्तरावर पदक प्राप्त केलेल्या एकूण ५४ खेळाडूंची यादी सन २०१८ मध्ये जाहीर केली असून सदर यादीतील एकाही खेळाडूस शासन सेवेत समाविष्ट करण्यात आले नसल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर यादीमध्ये सर्वसाधारण व दिव्यांग खेळाडूंचा समावेश असून, हे सर्व खेळाडू थेट शासन सेवेत समाविष्ट होण्यासाठी पात्र असतानाही त्यांना अद्याप शासकीय सेवेत सामावून घेण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राष्ट्रीय व आशियाई स्पर्धेत भारताचे धनुर्विद्येत प्रतिनिधीत्व करणाऱ्या विदर्भातील संदीप गवई या खेळाडूचे राज्य मानवी हक्क आयोगाने सुमोटो प्रकरण दाखल करुन आयुक्तांना नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी यादीतील समाविष्ट खेळाडूंना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये ३२ खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्यात आली आहे. तदनंतर २६ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये एका खेळाडूस थेट नियुक्ती देण्यात आली आहे.
(३) हे खरे आहे.
(४) अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्यासंदर्भात सुधारित धोरण निर्गमित करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.सदर धोरण अंतिम झाल्यावर थेट नियुक्ती बाबतची कार्यवाही करण्याचे प्रयोजित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई ते मोरा दरम्यानच्या फेरी बोटीवरील कामगारांवर उपासमारीची वेळ आल्याबाबत

**(२) * २३५५५ श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई ते मोरा दरम्यान सुरू असलेल्या फेरी बोटीचे (लॉन्च) ७५ टक्के प्रवासी कमी झाल्याने फेरी बोटीला लागणारे इंधन, कामगारांचा पगार आणि देखभाल दुरुस्तीसाठी लागणारा खर्च याबाबतचा प्रश्न फेरी बोट मालकांसमोर निर्माण झाला असून, या व्यवसायावर अवलंबून असलेल्या शेकडो कामगारांवर उपासमारीची वेळ आल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पारंपारिक फेरी बोट व्यवसाय टिकविण्यासाठी शासनाकडून आर्थिक मदत मिळावी किंवा करात सूट देण्याची मागणी फेरी बोट चालकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे :** (१) हे खरे नाही,
(२) हे, खरे नाही.

अशी मागणी शासनाकडे प्राप्त झाल्याची नोंद आढळून येत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खापर (ता.अक्कलकुवा जि.नंदुरबार) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये खराब औषधांचा साठा आढळून आल्याबाबत

**(३) * २३७५६ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खापर (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामधून लहान मुलांना दिली जाणारी औषधे खराब होऊन त्यात अळी सदृश्य किटक आढळून आल्याची बाब स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त औषधांचा सर्व साठा हा नंदुरबार जिल्ह्यातील दवाखान्यात वेगळा करून ठेवण्याचे आदेश जिल्हा आरोग्य अधिकारी, नंदुरबार यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी पुरवठादार व उत्पादक कंपनी यांचेवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदरचे औषध हे पुढील तपासणीसाठी अन्न व औषधी प्रशासन विभाग, नंदुरबार यांचेकडे पाठविण्यात आलेले आहे. सदर तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर तपासणी अहवालात पुरवठादार/ उत्पादक दोषी असल्याचे आढळुन आल्यास त्यांच्याविरुध्द नियमानुसार आवश्यक ती पुढील कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात क्षयरोगावरील औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(४) * २३८७५ श्री.राजेश राठोड, श्री.सत्यजीत तांबे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.राजहंस सिंह, श्री.प्रसाद लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात क्षयरोग निर्मुलनासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून विविध उपक्रम राबविण्यात येत असताना राज्यात क्षयरोगावरील औषधांचा तुटवडा निर्माण झाला असून औषध उत्पादक कंपनीला ३ एफडीसीए या संयुक्तीक औषधाची निर्मिती करून त्याच्या वितरणासाठी जवळपास तीन महिन्यांचा कालावधी लागणार असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय स्तरावर औषध खरेदीला झालेल्या विलंबामुळे हा तुटवडा निर्माण झाला असून केंद्र शासनाने राज्य शासनांना स्थानिक पातळीवर औषधे खरेदी करण्याच्या सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात अनेक रुग्णांमध्ये बहुऔषध प्रतिरोधक क्षयरोगाचे प्रमाण वाढत असून औषध तुटवड्यामुळे मुंबईसह राज्यातील दोन लाखांपेक्षा अधिक रुग्णांची व मुंबईमध्ये प्रत्येक महिन्याला साधारणपणे नव्याने सापडणाऱ्या ५ हजार नवीन रुग्णांची तसेच यापूर्वी उपचार सुरु असलेल्या रुग्णांची गैरसोय होणार असून देशाला सन २०२५ पर्यंत क्षयरोगमुक्त करण्याच्या उद्दिष्टात अडथळे निर्माण झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने निधीची तरतूद करुन सदरील औषधे तातडीने खरेदी करून क्षयरोग रुग्णांना लागणाऱ्या औषधांचा पुरवठा नियमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे, तथापि, माहे मे, २०२४ मध्ये केंद्रीय क्षयरोग विभागाकडून ३ एफडीसीए औषधांचा पुरवठा सुरु झालेला आहे.
(२) हे खरे आहे.

केंद्रीय क्षयरोग विभागाच्या दिनांक ०२/०२/२०२४ च्या पत्रान्वये सर्व राज्य सरकारांना राज्य / जिल्हास्तर ३ महीने किंवा केंद्र स्तरावरील खरेदी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत(यापैकी जे अगोदर घडेल तो पर्यंत) औषधे खरेदी करण्याच्या सुचना प्राप्त आहेत.
(३) हे खरे नाही.

राज्य स्तरावरून केलेल्या उपाययोजनांमुळे क्षय रुग्णांच्या औषधोपचारात प्रत्यक्ष खंड पडलेला नाही. त्यामुळे बहुऔषध प्रतीरोधक क्षयरोगाचे प्रमाण वाढल्याचे निर्दशनास आलेले नाही व सन २०२५ पर्यंत क्षयरोग मुक्त करण्याच्या उद्दिष्टात अडथळे निर्माण झालेले नाहीत.
(४) राज्य शासनामार्फत क्षय रूग्णाला लागणाऱ्या औषधांचा पुरवठा नियमित करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे,

१) माहे मार्च, २०२४ मध्ये प्रत्येक जिल्ह्यांना ३ एफडीसीए औषधांची तात्काळ खरेदी करता यावी यासाठी एकूण रु १.६३ कोटी अनुदान राज्यातील सर्व जिल्हास्तरावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

२) ३ एफडीसीए च्या औषधांची खरेदी करण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत रु ४.९५ कोटी रुपयांची तरतूद करून २ महिने पुरेल इतक्या औषधांची खरेदी प्रक्रिया महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरणाकडून राबविण्यात आलेली आहे.

३) त्याचबरोबर सन २०२४-२५ मध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत सर्व जिल्ह्यांकरीता एकूण रुपये १.६३ कोटी इतक्या निधीची जिल्हास्तरावर तरतूद करण्यात आलेली आहे. पुढील कालावधीत सदर औषधाचा तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी सर्व जिल्ह्यांना स्थानिक स्तरावर औषध खरेदीची परवानगी देण्यात आलेली आहे.

४) निक्षय औषधी प्रणालीव्दारे औषध साठ्याचे नियमित संनियंत्रण करण्यात येत असून गरजेनुसार ३ एफडीसीए औषधांची उपब्लधता करण्यात येत आहे. त्याचबरोबर गरजेनुसार ३ एफडीसीए पॅकमध्ये असलेली औषधे क्षयरुग्णांना सुटया स्वरुपात देण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला व मुर्तीजापूर (जि.अकोला) तालुक्यातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(५) * २२९०८ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला व मुर्तीजापूर (जि.अकोला) तालुक्यातील मौजे कुंभारी-डोंगरगाव, कुंभारी-मासा, कुंभारी-बाभूळगाव जुना रस्ता आणि कुंभारी सोनाळा या तीनही मार्गांची तसेच मुर्तीजापूर शहरापासून सुनोरी-मुर्तीजापूरकडे जाणाऱ्या मार्गांची देखील दुरवस्था झाली असून, सदर रस्ते वाहतुकीसाठी धोकादायक असल्यामुळे तेथील शेतकरी व विद्यार्थ्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असून या रस्त्यांवर अनेकदा अपघात झाल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत येथील शेतकरी व विद्यार्थ्यांच्या पालकांनी वेळोवेळी संबंधित अधिकाऱ्यांकडे मागणी केल्याचे तसेच सुनोरी-मुर्तीजापूरकडे जाणाऱ्या रस्त्याचा विकास व दुरुस्ती करण्याबाबत तेथील माजी सरपंच यांनी दिनांक १५ ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यासुमारास उपोषण करुन देखील अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला व मुर्तीजापूर (जि.अकोला) तालुक्यातील सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली व दुरुस्तीस दिरंगाई करणाऱ्या दोषीं अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

सदर रस्त्यांचा काही भाग नादुरुस्त आहे. तथापि, सदर रस्त्यांवर अपघात झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) व (३) सदर प्रश्नामध्ये एकूण पाच रस्त्यांची विचारणा करण्यात आली असून त्यांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

१. कुंभारी-डोंगरगाव रस्ता (ग्रामा-१६५) :

सदर रस्त्याची एकूण लांबी ३.०० कि.मी. असून सदर रस्त्याचे १६५० मी. लांबी सुस्थितीत आहे. उर्वरित लांबी नादुरुस्त असून सदर लांबीचे काम सन २०२४-२५ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

२. कुंभारी-बाभुळगाव रस्ता (ग्रामा-१३५) :

सदर रस्त्याची एकूण लांबी ४.०० कि.मी. असून संपूर्ण लांबी डांबरी पृष्ठभागाची आहे. सदर रस्त्याचे काम सन २०२२-२३ मध्ये मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत पूर्ण करण्यात आले आहे.

३. कुंभारी-सोनाळा रस्ता (ग्रामा-१७९) :

सदर रस्त्याची एकूण लांबी ३.०० कि.मी. असून सन २०२३-२४ मध्ये सदर रस्त्याचे रुपये २.०० कोटी इतक्या रकमेचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मंजूर करण्यात आले असून सदर काम प्रगतीत आहे.

४. कुंभारी-मासा रस्ता (योजनाबाह्य) :

सदरचा रस्ता योजनाबाह्य स्वरुपाचा असल्यामुळे रस्ते व पूल दुरुस्तीच्या योजनांमधून निधी उपलब्ध करता येत नाही.

५. सोनोरी मुर्तिजापूर ते चिखली (योजनाबाह्य) :

सदरचा रस्ता योजनाबाह्य स्वरुपाचा असल्यामुळे रस्ते व पूल दुरुस्तीच्या योजनांमधून निधी उपलब्ध करता येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाडा (जि.पालघर) तालुक्यातील उद्योग अन्यत्र स्थलांतरित झाल्याबाबत

**(६) * २३००१ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील उद्योगांना सातत्याने मागणी करूनही सोयी-सुविधा न पुरविल्याने येथील अनेक उद्योग (वापी) गुजरात, दिव-दमण या परराज्यात स्थलांतरित झाल्यामुळे स्थानिक कामगार बेरोजगार झाल्याचे तसेच तालुक्यातील औद्योगिक विकासावर दुष्परिणाम झाल्याची बाब दिनांक २७ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची दखल घेवून वाडा तालुक्यातील औद्योगिक क्षेत्राला चालना देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यामध्ये उद्योग धंद्याचा समतोल विकास होण्यासाठी व कमी विकसित भागात उद्योगधंदे स्थापित व्हावे या कारणास्तव राज्यामध्ये सन १९६४ पासून सामुहिक प्रोत्साहन योजना राबविण्यात येते. प्रचलित सामुहिक प्रोत्साहन योजना ही दिनांक १६/०९/२०१९ च्या शासन निर्णयाने जाहीर करण्यात आली आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी करण्यात आलेल्या तालुका वर्गीकरणानुसार ड, ड+, नक्षलग्रस्त जिल्हे, विना उद्योग जिल्हे व आकांक्षित जिल्हे वर्गवारी असलेल्या तालुक्यातील उद्योगांना अ,ब,क वर्गीकरण असलेल्या तालुक्यापेक्षा जास्तीच्या सवलती देण्यात येतात.

सदर योजनेनुसार वाडा तालुका हा ड+ संवर्गात समाविष्ट करण्यात आला असून, सदर योजनेतंर्गत वाडा तालुक्यासाठी एकूण पात्र गुंतवणूकीच्या ६०% रक्कमेचे प्रोत्साहन देय आहेत. त्यातंर्गत सदर तालुक्यात स्थापन होणाऱ्या उद्योग घटकास औद्योगिक प्रोत्साहन अनुदान,व्याज दर सवलत, विद्युत शुल्क माफी तसेच वीज दर सवलत देण्यात येते.

उद्यम पोर्टलवर दिनांक ३१/०३/२०२४ अखेर वाडा तालुक्यात २७७७ उपक्रमांची नोंद आहे. या क्षेत्रातील २०३ उद्योग घटकांना उद्योग संचालनालयामार्फत सामुहिक प्रोत्साहन योजनेतंर्गत पात्रता प्रमाणपत्र देण्यात आले आहे. त्याद्वारे रूपये ११०७.९३ कोटी एवढी गुंतवणूक आणि ६४५४ रोजगारनिर्मिती झाली आहे. सदर घटकांस रूपये ६४९.९३ कोटी एवढे औद्योगिक प्रोत्साहन अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती योजनेतंर्गत वाडा तालुक्यात सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ८९ प्रकरणे मंजूर करण्यात आले असून, त्याकरीता रूपये १७०४.३६ लक्ष इतके अनुदान मंजूर करण्यात आले आहे. तालुक्यामध्ये स्थापित होणाऱ्या उद्योग घटकास बीज भांडवल योजना व जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजनेतंर्गत प्रकरणे मंजूर करण्यात येतात.

तसेच वाडा तालुक्यातील उद्योजकांच्या काही अडी अडचणी असल्यास त्या सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा उद्योग मित्र समिती कार्यरत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील ७५ हजार लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गतचे अनुदान मिळाले नसल्याबाबत

**(७)** * **२३६०७ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सुमारे ७५ हजार लाभार्थ्यांना अनुदान न मिळाल्याने मंजूर लाभार्थ्यांची घरे अपूर्ण अवस्थेत असून पावसाळयात त्यांच्या घराचा प्रश्न निर्माण झाला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपूर्ण अवस्थेतील घरे पूर्ण होण्यासाठी प्रधानमंत्री योजनेचे अनुदान लाभार्थ्यांना वितरीत करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) कोल्हापूर जिल्ह्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत १६,८६५ घरकुले मंजूर आहेत. त्यापैकी, १५,१९४ घरकुले पूर्ण झालेली असून, १,६७१ घरकुले प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील श्री बिरोबा देवस्थाने विकसित करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(८)** * **२३३४२ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री बिरोबा देवस्थान, आरेवाडी (ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली), श्री महालिंगराया देवस्थान, हुलजंती (ता.मंगळवेढा,जि.सोलापूर), श्री बिरोबा देवस्थान, हुन्नूर (ता.मंगळवेढा,जि.सोलापूर), श्री विठ्ठल बिरदेव देवस्थान, पट्टणकोडोली (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर), श्री वाशी अवघडखान देवस्थान (ता.करवीर, जि.कोल्हापूर) ह्या श्री क्षेत्र बिरोबा देवाची मूळ स्थानकांची दूरवस्था झाल्यामुळे येणाऱ्या भाविकांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर श्री बिरोबा देवस्थाने विकसित करण्याच्या दृष्टीने आराखडा तयार करुन निधी उपलब्धतेची मागणी मा.लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे दिनांक २९ सप्टेंबर, २०२३ व माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान करूनही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त श्री बिरोबा देवस्थाने विकसित करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.
(२) या प्रकरणी मा.मुख्यमंत्री कार्यालयाकडे खात्री केली असता, त्या कार्यालयात असे निवेदन आढळून आले नाही.
(३) श्री बिरोबा देवस्थान आरेवाडी ता.कवठेमहांकाळ जि.सांगली या तीर्थक्षेत्राच्या विकास कामांसाठी रुपये २९७.०३ लक्ष, श्री महालिंगराया देवस्थान हुलजंती ता.मंगळवेढा जि.सोलापूर या तीर्थक्षेत्राच्या विकास कामांसाठी रुपये २०६.९९ लक्ष, श्री बिरोबा देवस्थान हुन्नूर ता.मंगळवेढा जि.सोलापूर या तीर्थक्षेत्राच्या विकास कामांसाठी रुपये ९७.५३ लक्ष व श्री विठ्ठल बिरदेव देवस्थान पट्टणकोडोली ता.हातकणंगले जि.कोल्हापूर या तीर्थक्षेत्राच्या विकास कामांसाठी रुपये ४६६.९२ लक्षची प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच, पर्यटन व सांस्कृतिक कडून श्री बिरोबा देवस्थान, आरेवाडी ता.कवठेमहांकाळ जि.सांगली या तीर्थक्षेत्राच्या विकास कामांसाठी रुपये ८१७.७५ लक्ष इतकी रक्कम मंजूर केलेली आहे. तसेच, श्री वाशी अवघडखान देवस्थान ता.करवीर जि.कोल्हापूर या ठिकाणी पर्यटन, यात्रा स्थळांचा विकास, जनसुविधा, नागरी सुविधा इत्यादी योजनांमधून विकास कामे झालेली आहेत. तथापि, सदर ठिकाणी इतर सुविधा करीता लोकप्रतिनिधी अथवा इतर कोणीही लेखी मागणी प्रस्ताव जिल्हा परिषदेस दिलेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाढवण (जि.पालघर) येथील बंदरामुळे अणुशक्ती केंद्राला धोका निर्माण होणार असल्याबाबत

**(९) * २३०११ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील अणुशक्ती केंद्राजवळ काही अंतरावर जागतिक दर्जाचे वाढवण बंदर उभारण्यात येणार असून, बंदराच्या निर्मितीनंतर येथील वर्दळीमुळे अणुशक्ती केंद्राला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर वाढवण बंदराच्या उभारणीकरीता भाभा अणुसंशोधन केंद्राचे (BARC) "ना-हरकत" प्रमाणपत्र घेण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, त्याचे स्वरूप काय आहे ?

**श्री.संजय बनसोडे :** (१) पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात वाढवण येथे नवीन बंदराची निर्मिती करण्यात येणार आहे.

परंतु त्यामुळे तारापूर अणुऊर्जा केंद्राला धोका निर्माण होण्याची बाब निदर्शनास आली असल्याची बाब खरी नाही.
(२) होय.

(३) परमाणू ऊर्जा विभागाने दिनांक ३१/०७/२०१९ अन्वये वाढवण बंदराच्या उभारणीकरीता ना- हरकत पत्र दिले असून त्यानंतर परमाणु ऊर्जा विभागाने दिनांक २९/०१/२०२४ रोजी याची पुष्टी केली आहे.

वाढवणच्या दक्षिणेस ११ कि.मी. अंतरावर स्थित असलेल्या तारापूर ॲटोमिक पॉवर स्टेशन (TAPS) वर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा अभ्यास इंडियन नॅशनल सेंटर फॉर ओशन इनफॉर्मेशन सर्व्हिस (INCOIS), सीडब्ल्यूपीआरएस (CWPRS) सारख्या वेगवेगळया तज्ज्ञ संस्थांकडून केला आहे. वाढवण बंदराच्या विकासामुळे तारापूर ॲटोमिक पॉवर स्टेशनच्या सुविधांवर परिणाम होणार नाही.

तसेच वाढवण बंदराच्या विकासामुळे टीएपीएस (TAPS) च्या पाण्याच्या व्यवस्थेवर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही. बंदर सुरक्षा ही केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल यांच्याकडे असेल आणि ही प्रक्रिया जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरण आणि मुंबई प्राधिकरण यांच्याकडे देखील अस्तित्वात आहे. त्यामुळे वाढवण बंदराच्या विकासामुळे तारापूर अणुऊर्जा केंद्रावर कोणतेही दुष्परिणाम होणार नाहीत.

-----------------

## राज्यातील मनोरुग्णांकरीता मानसिक आरोग्य प्राधिकरण व पुनर्वसन केंद्र उभारण्याबाबत

**(१०) * २३३५६ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानसिक आजारातून बरे झालेल्यांना त्यांचे कुटुंब/समाज स्वीकारत नसल्याने व त्यांच्यासाठी पुनर्वसन केंद्र कार्यान्वित नसल्याने मा.उच्च न्यायालयाने पुनर्वसन केंद्र सुरू करण्याचे व मनोरुग्ण अवस्थेतून बरे झालेल्यांसाठी राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरण व पुनर्वसन केंद्र महत्त्वाचे ठरत असल्याने त्याकरीता राज्य शासनाने निधी उपलब्ध करून देण्याबाबत आदेश दिल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात मानसिक आरोग्य प्राधिकरण या नोडल एजन्सीच कार्यरत नसल्याने मानसिक आरोग्य सेवा कायदा, २०१७ ची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.न्यायालयाच्या निर्देशानंतर शासनाकडून मनोरुग्णांच्या पुनर्वसनाबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक ०१/०९/२०२३ च्या रोजीच्या शासन निर्णयान्वये ज्या मानसिक आजारमुक्त व्यक्तींना पुढील उपचाराची गरज नाही किंवा ज्या मानसिक आजारमुक्त व्यक्तींना त्यांचे कुटुंब स्विकारत नाही अश्या व्यक्तींकरीता "स्वयंसेवी संस्थामार्फत मानसिक आजार मुक्त व्यक्तींकरीता पुनर्वसन गृहे योजना" (हाफ वे होम) ही योजना राबविण्यास मंजुरी दिलेली आहे. त्यानुषंगाने दिव्यांग कल्याण विभागाने १६ पुनर्वसन गृहांना मंजुरी दिलेली आहे. तसेच पुनर्वसन गृहाबाबत प्रवेशाचे निकष, मुक्ततेचे निकष, पुनर्वसन गृहात व्यवस्थापनेची जबाबदारी, सोई सुविधा, समुपदेशन, वैद्यकीय उपचार, त्यानुषंगिक सर्व बाबीचा समावेश होणार आहे. तसेच याबाबत दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे यांच्याकडून दिनांक २०/११/२०२३ रोजी याबाबत मनोविकृती क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थांकडून जाहिरातीद्वारे प्रस्ताव मागविण्यात आले होते. तसेच या पुनर्वसन गृहामध्ये स्थलांतर होणाऱ्या प्रत्येक लाभार्थी मागे दिव्यांग कल्याण आयुक्तालय पुणे रुपये १२,०००/- अदा करणार आहे.

(२) हे खरे नाही.

राज्यात मानसिक आरोग्य कायदा, २०१७ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरीता राज्यस्तरावर राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरण व उपसंचालक आरोग्य सेवा स्तरावर ८ ठिकाणी ठाणे, पुणे, नाशिक, कोल्हापूर, अकोला, औरंगाबाद,लातूर व नागपूर येथे मानसिक आरोग्य आढावा मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे.

(३) राज्यातील चारही प्रादेशिक मनोरुग्णालयातील बरे झालेल्या व्यक्तींना दिव्यांग कल्याण आयुक्तालयामार्फत स्वयंसेवी संस्थेकडे स्थलांतरीत करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील चांभारशेत – भुसारपाडा ते तिलोंडा रस्त्याचे डांबरीकरण व नुतनीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(११)** * **२३२९९ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत चांभारशेत – भुसारपाडा ते तिलोंडा रस्त्याच्या डांबरीकरण व नुतनीकरणाचे रुपये ५ कोटींचे काम ठेकेदारांकडून मनमानी पध्दतीने व अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असून क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून सदर कामाची पाहणी देखील करण्यात येत नसल्याची बाब दिनांक १० एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम मे. शिवसाई कंन्स्ट्रक्शन एजन्सी ही कंपनी करित असून रस्ता तयार करण्याऐवजी सदर ठेकेदार कंपनीने रस्त्याच्या बाजुस एक मीटरची साईडपट्टी खोदून त्यावर खडी व ग्रीट टाकून, रस्ता आहे त्याच स्थितीत ठेवला असतानाही सदर कामासाठी कोट्यवधी रुपये शासनाकडून घेतले असल्याचे दिनांक ५ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने रस्त्याच्या कामाची पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले आहे आणि सदरहू रस्त्याचे दर्जाहीन काम करणाऱ्या ठेकेदार व संबंधित अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

भुसारपाडा ते तिलोंडा चांभारशेत ता.जव्हार,जि.पालघर हा रस्ता ग्रामीण मार्ग ९४ दर्जाचा असून या रस्त्याचे दर्जोन्नतीचे काम प्रधानमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-III अंतर्गत मंजूर आहे. सदर कामाची प्रशासकीय मान्यता रक्कम ४६२.९३ लक्ष इतकी आहे. सदर कामाची प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, पालघर येथील क्षेत्रिय अधिकाऱ्यांमार्फत नियमित पाहणी करून कामाच्या गुणवत्तेची तपासणी करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

सदर कामाचे दिनांक २९/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मे.शिवसाई कंस्ट्रक्शन, ठेकेदार पालघर यांना कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. त्यानुसार कंत्राटदाराकडून रस्त्याच्या दोन्ही बाजूस ०.५२५ मी. इतके रूंदीकरण GSB (खडी) वापरून करण्याचे काम प्रगतीत आहे.

तसेच रस्त्याच्या ३.००० कि.मी.लांबीमध्ये डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सदर काम निविदेत नमूद Milestone प्रमाणे प्रगतीत असून कामाचे देयक अद्यापपर्यंत अदा करण्यात आलेले नाही.

(३) हे खरे नाही.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य गुणवत्ता निरीक्षक यांनी दिनांक २७/०२/२०२४ रोजी निरीक्षण दौरा केला असून सदर कामास समाधानकारक असा शेरा दिला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डोंबिवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील "हॅप्पी किड्स डे केअर" सेंटरमध्ये लहान मुलांवरील अत्याचार प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(१२) * २३४८८ श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे, श्री.प्रवीण दटके, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील फडके रोडवरील लहान मुलांचा सांभाळ करणाऱ्या हॅप्पी किड्स डे केअर सेंटर या पाळणाघरात लहान मुलांचा छळ आणि मारहाण होत असल्याची बाब दिनांक २१ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हॅप्पी किड्स डे केअर सेंटरच्या पाळणाघरातील मुलांना आनंददायी सोयी-सुविधा उपलब्ध होण्यासाठी तसेच राज्याच्या कानाकोपऱ्यात पसरलेल्या पाळणाघरांवर अंकुश ठेवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच सदर प्रकरणी दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे आहे.

सदर बाब दिनांक १८/०३/२०२४ रोजी निर्दशनास आली आहे.

(२) सदर प्रकरणी डे केअर सेंटरच्या लाभार्थींच्या पालकांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १९/०३/२०२४ रोजी (१८.३२ वाजता) FIR No. ०३५२ नुसार "हॅप्पी किडस डे केअर" फ़डके रोड, डोंबिवली पूर्व, जि.ठाणे हे सेंटर चालविणाऱ्याविरूध्द डोंबिवली पोलीस स्टेशन, जि.ठाणे या ठिकाणी भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३२४, ३४ व अल्पवयीन न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायदा २०१५ चे कलम ७५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खाजगी संस्थांच्या पाळणाघरांकरीता केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथील ससून रुग्णालयाच्या बी.जी. वैद्यकीय महाविद्यालयातील महिला निवासी डॉक्टरांवर रँगिंग झाल्याबाबत

**(१३) * २३१९५ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ससून रुग्णालय (जि.पुणे) येथील बी.जी. वैद्यकीय महाविद्यालयात क्ष-किरणशास्त्र (रेडिओलॉजी) आणि भूलशास्त्र (अॅनेस्थेशिया) या विभागात पदव्युत्तर पदवीच्या प्रथम वर्षात शिकत असलेल्या महिला निवासी डॉक्टरांवर रँगिंग करण्यात आली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे डिसेंबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास अस्थिरोग विभागातील निवासी डॉक्टरांनी वसतिगृहात साजऱ्या केलेल्या नववर्षाच्या पार्टीनंतर दुसऱ्या दिवशी व्हायरल झालेले मद्याच्या बाटल्यांच्या फोटोची दखल घेऊन मा.उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री यांनी या प्रकरणी सक्त ताकीद दिली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बी.जी. वैद्यकीय महाविद्यालयातील सदर घटनेबाबत मा.उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री महोदयांनी सक्त ताकीद देऊनही रँगिंगचे प्रकार घडल्यामुळे रुग्णालय प्रशासनाकडून तसेच स्थानिक पोलिसांकडून सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

बै.जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथील क्ष-किरणशास्त्र (रेडिओलॉजी) आणि भूलशास्त्र (अॅनेस्थेशिया) या विभागात पदव्युत्तर पदवीच्या प्रथम वर्षात शिकत असलेल्या महिला कनिष्ठ निवासी-१ डॉक्टर यांनी विभागातील इतर कनिष्ठ निवासी-१ डॉक्टरांकडून मानसिक त्रास देत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारी या रॅगिंग स्वरुपाच्या नसून विभागातील कनिष्ठ निवासी यांच्यातील आपापसांतील गैरसंवादातून झालेल्या गैरसमजूतीमुळे प्रकरण उदभवले असल्याचे अँटी रॅगिंग समितीने निष्कर्षात नमूद केलेले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) दिनांक ३१/१२/२०२३ रोजी झालेल्या नववर्षाच्या पार्टीमध्ये सहभागी झालेल्या उमेदवारांवर सहा महिन्यांकरीता वसतिगृह निलंबन या स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेचा निधी लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्याबाबत

**(१४) * २३८४२ श्री.श्रीकांत भारतीय, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेंतर्गत आई अथवा वडील गमावलेल्या बालकांना दरमहा २२५० रूपये दिले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार राज्यातील ७० हजार बालकांसाठी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पात १९० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांना पहिल्या सहा महिन्यांकरीता माहे जुलै, २०२३ मध्ये ५४ कोटी रूपये तसेच माहे मार्च, २०२४ मध्ये ९५ कोटी रुपये वर्ग करण्यात येऊनही केवळ सदर आयुक्तालयाच्या ढिसाळ कार्यपध्दतीमुळे लाभार्थी लाभापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील हजारो नवीन लाभार्थ्यांचे प्रस्ताव जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयांमध्ये प्रलंबित असून, मागील वर्षभरापासून लाभार्थ्यांच्या बँक खात्यात या योजनेच्या लाभाची रक्कमच वर्ग करण्यात आलेली नसल्याने राज्यातील ७५ हजारांहून अधिक पात्र बालकांना लाभ मिळू शकला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू योजनेची सकारात्मक तसेच प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने तसेच या योजनेच्या आजवरच्या अंमलबजावणीत वेळकाढूपणा करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही,

सन २०२३-२४ या वित्तीय वर्षातील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेच्या लाभार्थ्यांना पहिल्या सहामाहीचा लाभ देण्यासाठी दिनांक २५ जुलै, २०२३ अन्वये रुपये ५४.८४ कोटी एवढा निधी वितरीत करण्यात आला होता.तसेच शासन निर्णय दिनांक ०१/०३/२०२४ अन्वये रुपये ९५.२९ कोटी आणि शासन निर्णय दिनांक २८/०३/२०२४ अन्वये रुपये ४०.८४ कोटी इतका निधी अनुदान अदा करण्यासाठी वितरीत करण्यात आला आहे. लाभाची रक्कम वितरीत होण्यास होणार विलंब टाळण्यासाठी सन २०२३-२४ या वित्तीय वर्षापासून सदर योजनेचा लाभ आयुक्तालय स्तरावरुन थेट बालकाच्या बँक खात्यामध्ये जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी सर्व लाभार्थ्यांची माहिती एकत्रित करण्यात आलेली आहे. परंतु काही जिल्ह्यातील लाभार्थ्यांच्या माहितीमध्ये बँकेचा चुकीचा IFSC, MICR कोड, बालकांच्या नावामधील स्पेलिंगमुळे नावांतील तफावत, अर्धवट बँक खाते क्रमांक अशा तफावती होत्या. तसेच अनेक लाभार्थ्यांचे बँक खाती बंद होती, लाभार्थ्यांचे कुटूंबाने इतरत्र स्थलांतर केल्याने त्या लाभार्थ्यांची माहिती प्राप्त करुन घेण्यास अडचणी येत होत्या. अशा अनेक कारणांमुळे लाभाची रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा करण्यास अडथळे येत होते. तथापि, संबंधित जिल्ह्याकडून लाभार्थ्यांची अद्ययावत माहिती प्राप्त करुन घेऊन मार्च, २०२४ अखेर एकूण रुपये १,०३,४९३ लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर रुपये १८९.५ कोटी इतकी लाभाची रक्कम जमा करण्यात आली आहे.

(४) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्यासाठी येणाऱ्या तांत्रिक अडचणींवर मात करुन अनुदान वितरणाची कार्यवाही करण्यात आली असल्याने अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

## कोल्हापूर जिल्ह्यातील शासकीय रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये श्वान हल्ल्यातील जखमी रुग्णांवर उपचार करण्यास दिरंगाई होत असल्याबाबत

**(१५) * २३१०१ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात भटक्या श्वानांची गंभीर समस्या निर्माण झाली असून, श्वान हल्ल्यात जखमी झालेल्या रुग्णांवरील उपचाराकरीता जिल्हा शासकीय रुग्णालय, तालुका रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रात रेबीज लस उपलब्ध होत नसून, उपचार करण्यास दिरंगाई होत असल्यामुळे बऱ्याच रुग्णांना प्राण गमवावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील श्वान हल्ल्यात जखमी झालेल्या रुग्णांना त्वरित उपचार मिळण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील आरोग्य संस्थांमध्ये (सीपीआर/ ग्रामीण/ उपजिल्हा रुग्णालय/ इंदीरा गांधी सामान्य रुग्णालय, इचलकरंजी/ प्राथमिक आरोग्य केंद्र/ नागरी आरोग्य केंद्र) मुबलक प्रमाणात श्वानदंश लसीचा साठा उपलब्ध करण्यात आलेला असून या ठिकाणी नियमित उपचार, लसीकरण व शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतात.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये माहे जानेवारी, २०२४ ते एप्रिल, २०२४ अखेर एकूण ३१,१६१ व्यक्तींना श्वानदंश झाल्याची व त्यापैकी माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये ०२ व्यक्तींचा आणि माहे मार्च, २०२४ मध्ये एका व्यक्तींचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची नोंद झाली आहे.

(२) कोल्हापूर जिल्ह्यातील आरोग्य संस्थांमध्ये (सीपीआर/ ग्रामीण/ उपजिल्हा रुग्णालय/ इंदीरा गांधी सामान्य रुग्णालय, इचलकरंजी/ प्राथमिक आरोग्य केंद्र/ नागरी आरोग्य केंद्र) इ.ठिकाणी मुबलक प्रमाणात रेबीज लस उपलब्ध ठेवण्यात आली आहे व आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापुर मार्फत नियमित उपचार, लसीकरण व शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## राज्यात स्वतंत्र आयुष मंत्रालय स्थापन करण्याबाबत

**(१६) * २३५७२ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व वैद्यकीय शाखांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी तसेच आयुर्वेद उन्नतीसाठी "केंद्र शासनाच्या धर्तीवर, राज्य शासनाचे स्वतंत्र आयुष मंत्रालय स्थापना करण्यात येईल" असे मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान यांचेतर्फे पुणे येथील आयोजित शासकीय कार्यक्रमामध्ये दिनांक १६ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास माध्यमांसमोर सांगितले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वतंत्र आयुष मंत्रालय स्थापन होणेसाठी शासनास किती कालावधी लागणार असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) राज्यात आयुर्वेद संचालनालयाची स्थापना १९५७ साली झाली असून केंद्र शासनाने सन २०१२ मध्ये स्वतंत्र आयुष मंत्रालय स्थापन केल्यानंतर राज्यात आयुर्वेद संचालनालयाचे आयुष संचालनालय असे नामकरण करण्यात आले आहे.

आयुष संचालनालयामार्फत राज्यात आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी या आयुष चिकित्सा पध्दतींमधील महाविद्यालयांमार्फत दर्जेदार पदवी- पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकवून अर्हताधारक वैद्य, हकीम, डॉक्टर निर्माण केले जातात. आयुष महाविद्यालयांशी संलग्नित रुग्णालयांमार्फत दर्जेदार आरोग्य सेवा पुरविण्यात येतात. आयुष चिकित्सा पध्दतींच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशांकरीता सामायिक प्रवेश कक्षासोबत समन्वय ठेवण्यात येतो. आयुष क्षेत्रातील संशोधनास व औषधी वनस्पतींची लागवड करण्याबाबत आयुष संचालनालयामार्फत प्रोत्साहन देण्यात येते. औषध निर्मितीसाठी नांदेड येथे रसशाळा चालविली जाते. याव्यतिरिक्त सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत 'राष्ट्रीय आयुष मिशन' ची राज्यात अंमलबजावणी करण्यात येते. अशा रितीने आयुष संचालनालयामार्फत सक्षमरित्या कार्यवाही होत असल्यामुळे राज्यात स्वतंत्र आयुष मंत्रालय अथवा विभाग स्थापन करण्याची आवश्यकता वाटत नाही. त्यामुळे राज्यात स्वतंत्र आयुष मंत्रालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव सद्य:स्थितीत विचाराधीन नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माथेरान (ता. कर्जत, जि.रायगड) येथे मंजूर झालेला रस्ता अद्याप अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(१७) * २३६४७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माथेरान (ता.कर्जत, जि.रायगड) येथे १३ किलोमीटरचा रस्ता मंजूर होवूनही ठेकेदाराने सदर रस्ता अद्यापही न केल्यामुळे १२ आदिवासी वाड्यांमधील नागरिकांना पायवाटेवरुन पायपीट करावी लागत असून पावसाळयात या पायवाटांवर पाणी साचल्याने किंवा पायवाटा पावसाळयात वाहून गेल्याने आदिवासी वाड्यांमधील नागरिकांना ये-जा करणे अडचणींचे होत असल्याचे माहे मार्च, २०२४ च्या चौथ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने माथेरान येथील १३ किलोमीटरचा रस्ता मंजूर होवूनही रस्त्याचे बांधकाम न करणाऱ्या संबंधित ठेकेदारावर कोणती कारवाई केली तसेच सदर रस्त्याचे बांधकाम लवकर पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) सदरहू कामास विभागाच्या दिनांक ०८ मार्च, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये १८८६.९० लक्ष इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. सदरहू कामाचा मक्ता मे. सिद्धिविनायक कंन्सट्रक्शन यांना देण्यात आला आहे. मात्र निविदा अटी व शर्तीनुसार मक्तेदार यांनी सुरक्षा अनामत रक्कम भरण्यास व करारनामा करण्यास विलंब केला तसेच मा.भारत निवडणूक आयोगाच्या दिनांक १६ मार्च, २०२४ रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आल्याने कार्यारंभ आदेश देण्यात आले नाही.सद्य:स्थितीत आचारसंहिता संपुष्टात आल्यामुळे कामाचे कार्यारंभ आदेश देवून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आरोग्य विभागाची वॉर रूम सुरु करण्याबाबत

**(१८) * २३८२० ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनासह वेगवेगळे साथीचे रोग आजार, महामार्गांवरील वाढते अपघात, मोठ्या दुर्घटना वा विशिष्ट भागात अचानक पसरणारे साथीचे रोग तसेच राष्ट्रीय व राज्य आरोग्य कार्यक्रमांसह आरोग्य विभागाची वाढती व्यापकता लक्षात घेऊन आरोग्य यंत्रणांचा समन्वय तसेच आवश्यक त्या ठिकाणी तातडीने आरोग्य सेवा पोहोचावी यासाठी आरोग्य विभागाची 'वॉर रूम' सुरू करण्याचे आदेश मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री महोदयांनी माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यासुमारास दिले असून सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत तसेच आरोग्य विभागाची 'वॉर रूम' सुरू करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे,

केंद्र शासनाने राज्यामध्ये एक Health Emergency Operation Centre स्थापन करणेबाबत कळविले आहे. याबाबत राज्यस्तरावर अत्यावश्यक परिस्थितीमध्ये गावपातळीपर्यंत आरोग्य सेवा पुरविण्यासाठी सर्व अत्यावश्यक आरोग्य सुविधांचा समन्वय करुन वेळेत तातडीची सेवा देण्यासाठी वॉर रुम (कन्ट्रोल रुम) तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. यात १०२,१०४,१०८ यांच्या सुविधा आणि टेली कन्सल्टेशन सुविधा यांचे समन्वय करुन यंत्रणा उभारण्यात येणार आहे.

(२) यासाठी आरोग्य भवन मुंबई आणि उरो रुग्णालय, औंध, पुणे येथे जागा तपासण्यात आली आहे व त्यानुसार प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हा परिषदेतील शासकीय कर्मचाऱ्यांनी बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करुन शासकीय लाभ घेतल्याबाबत

**(१९)** * **२३१६१ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय कर्मचारी पदावर नियुक्त झाल्यानंतर केवळ बदली व इतर लाभ घेण्यासाठी दिव्यांग बनत असल्याप्रकरणी बीड जिल्हा परिषदेने केलेल्या फेरतपासणीमध्ये ५२ दिव्यांग कर्मचारी हे ४० टक्के दिव्यांग नसताना त्यांना शासकीय रुग्णालयांकडून बनावट प्रमाणपत्र देण्यात आले असल्याचे निदर्शनास आल्यानंतर अशा बनावट दिव्यांगाचा शोध घेण्यासाठी पडताळणी करण्याचा निर्णय शासनाने दिनांक ३ डिसेंबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी आजपर्यंत किती दिव्यांगांची पडताळणी करण्यात आली तसेच याप्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांचे अधिपत्याखालील जिल्हा रुग्णालय, बीड व जिल्हा आरोग्य अधिकारी, बीड यांचे स्तरावर वैद्यकीय अधिकारी यांची समिती स्थापन करून प्राथमिक तपासणी करण्यात आली व संशयित दिव्यांगाच्या दिव्यांगत्वाची पुनर्तपासणी करीता स्वामी रामानंद तिर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई येथील वैद्यकीय मंडळाकडे पाठविण्यात आले. सदर मंडळाकडून तपासणी होऊन ४० टक्क्यांपेक्षा कमी दिव्यांगत्व असल्याचे वैद्यकीय अहवालावरून आढळून आले. तद्नंतर ५२ व २६ असे एकूण ७८ शिक्षकांना निलंबित करून पुढील कार्यवाही जिल्हा परिषद, बीड स्तरावर सुरू करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकरणात मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांच्या दिनांक २४/०२/२०२३ रोजीच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील जलजीवन मिशन अभियानांतर्गत पाणीपुरवठा योजनांची अपूर्णावस्थेतील कामे पूर्ण करण्याबाबत

**(२०)** * **२३२४८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत पाणीपुरवठा योजनांची कामे संथगतीने सुरु असून, जिल्ह्यात माहे डिसेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान या योजनेंतर्गत सर्व मंजूर कामे प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हा परिषदेकडून जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत १ हजार ४२२ पाणीपुरवठा योजना राबविल्या जात असून, या योजनांपैकी ३१० योजनांची कामे पूर्ण झाली असून, उर्वरित १ हजार ११२ गावे अद्याप पाण्याच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत काही ठिकाणी कामे न करताच ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून देयके अदा करण्यात आली आहेत तसेच अनेक ठिकाणी मंजूर योजनांमध्ये जुन्याच योजनेतील पाईपलाईनचा वापर करून नवीन योजना राबविल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रायगड जिल्ह्यातील जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली आहे तसेच, सदर योजनेतील कामांबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

रायगड जिल्ह्यातील जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत जिल्हा परिषदेमार्फत १४९६ व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत ३१ अशा एकूण १५२७ योजना मंजूर आहेत. ६१३ योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण झाल्या आहेत. त्यापैकी ३१७ योजना आर्थिक व भौतिकदृष्टया पूर्ण करुन देखभाल दुरुस्तीसाठी ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत. ८६७ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरीत १६ योजनांची कामे सुरु करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या मौजे चौक, ता.खालापूर, जि.रायगड या योजनेचे काम ग्रामपंचायतीच्या असहकार्यामुळे बंद आहे. तथापि, रायगड जिल्ह्यातील उर्वरीत सर्व योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) हे खरे नाही.
(४) रायगड जिल्ह्यातील ८६७ योजनांची कामे प्रगतीपथावर असून, १६ योजनांची कामे सुरु करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

जिल्ह्यातील जल जीवन मिशन अभियानातंर्गत प्रगतीपथावर कामे असलेल्या योजनांसंदर्भात जागेच्या, वन विभागाकडील परवानगीच्या अडचणी येत असल्यामुळे, त्या संदर्भात जिल्हास्तरावर वारंवार बैठक आयोजित करण्यात येऊन अडचणी दुर करण्यात येत आहेत. तसेच जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत प्राप्त होणाऱ्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा स्तरावर बैठक आयोजित करुन तक्रारींचे निरसन करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील १७ वैद्यकीय महाविद्यालयांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२१) * २३३१७ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.राजहंस सिंह, श्री.निलय नाईक, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १७ वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये एक हजारांहून अधिक शिक्षकांची पदे अनेक वर्षांपासून रिक्त असल्याने डॉक्टर ऑफ मेडिसिन (एम.डी.) आणि मास्टर ऑफ सर्जरी (एम.एस.) करणाऱ्या ६ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये पात्र शिक्षकांची नियुक्ती करावी अशी विनंती निवासी डॉक्टरांच्या संघटनेने (केंद्रीय मार्ड) मा.वैद्यकीय मंत्री महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयांमध्ये सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापकांची पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर विनंतीनुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता राज्यातील १७ वैद्यकीय महाविद्यालयांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अध्यापकीय पदे काही प्रमाणात रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु त्याचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बाबीवर परिणाम होत नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) अध्यापकीय संवर्गातील सरळसेवा कोट्यातील रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे आस्थापना मंडळामार्फत भरण्याची कार्यवाही सुरू आहे. अध्यापकांची संवर्गातील रिक्त पदे नियमित रित्या भरेपर्यंत करार तत्वावर भरण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गंगापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील ट्रॉमा केअर युनिटकरीता निधी मंजूर करुन रिक्त पदे भरण्याबाबत

**(२२) * २३०३३ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील ट्रॉमा केअर युनिटला दिनांक ८ मार्च, २००६ रोजी वा त्यादरम्यान प्रशासकीय मान्यता मिळाली असून, सन २०१० मध्ये वा त्यासुमारास १०९.७३ लक्ष रुपयांचा निधी वितरीत करण्यात आल्यानंतर प्रत्यक्ष ट्रॉमा केअर युनिटच्या बांधकामास सन २०१२ मध्ये वा त्यासुमारास सुरुवात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्राप्त निधीमधून फक्त पहिल्या मजल्याचे काम पूर्ण झाले असून, ट्रॉमा केअर युनिटच्या वरच्या मजल्याचे बांधकाम व इतर कामे करणेसाठी अतिरिक्त रुपये २३४.०० लक्ष रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता शासनस्तरावर सन २०२१ पासून प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात विविध संवर्गातील ६४ पदे मंजूर असून त्यापैकी २१ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०२२-२३ या वर्षात उपजिल्हा रुग्णालय गंगापूर येथे ८६,३६० बाहयरुग्णांच्या व ४९,२७५ आंतररुग्णांच्या तपासण्या व जवळपास ६०० शस्त्रक्रिया झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, गंगापूर येथील उपजिल्हा रुग्णालय व ट्रॉमा केअर युनिट येथे रुग्णाची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने ट्रामा केअर युनिटसाठी निधी मंजूर करण्यासाठी व रिक्त पदे भरण्यासाठी शासनाकडून कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

ट्रॉमा केअर युनिटचे तळ मजल्याचे बांधकाम पूर्ण असून सुधारित पहिल्या मजला बांधकाम व इतर कामाचे रुपये २,२८,०८,६७८/- इतक्या किंमतीचे अंदाज व आराखडे माहे मार्च, २०२४ रोजी शासनास प्राप्त झाले असून त्यावर पुढील कार्यवाही शासन स्तरावर चालू आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

सदर उपजिल्हा रुग्णालयात ६४ पदे मंजूर असून नवीन पदभरती मध्ये पदे भरण्यात आली असून सद्य:स्थितीत १२ पदे रिक्त आहेत.
(४) हे अंशत: खरे आहे.

सन २०२२-२३ मध्ये उपजिल्हा रुग्णालय गंगापूर येथे एकूण २५३९ आंतररुग्ण, ६८,१२३ बाहयरुग्णांची नोंद झालेली आहे. ३०५ शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून ४९,२७५ प्रयोगशाळा तपासण्या झालेल्या आहेत.
(५) ट्रॉमा केअर युनिट गंगापूर येथील पहिला मजला बांधकामाचे अंदाज व आराखड्यास मान्यता प्रदान करुन निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हा परिषदेला अतिवृष्टी व पुरामुळे नुकसान झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२३) * २३६८७ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे दरवर्षी रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता शासनाकडून निधी उपलब्ध करुन दिला जात असून, नागपूर जिल्हा परिषदेतील बांधकाम विभागाने रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामांसाठी ४६२ कोटी रुपयांच्या मागणीचा प्रस्ताव शासनास सादर केला असून अद्यापपर्यंत सदरील निधी जिल्हा परिषदेला प्राप्त झाला नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर जिल्हा परिषदेस रस्त्यांच्या कामांसाठी प्रलंबित निधी उपलब्ध होण्याकरीता शासनाकडून कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

अतिवृष्टी व पूरहानीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी "अतिवृष्टी व पूरहानी कार्यक्रम (३०५४-२९११)" सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून सुरु करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून सन २०२२-२३ मध्ये रुपये ६.९० कोटी व सन २०२३-२४ मध्ये रुपये १४६.६२ कोटी रकमेचा प्रस्ताव प्राप्त झाला होता.मात्र, सन २०२२-२३ मध्ये आर्थिक वर्षाच्या शेवटी वित्त विभागाने निधी उपलब्ध करुन दिल्यामुळे कोणत्याही जिल्ह्याला निधी देता आला नाही. तसेच सन २०२३-२४ मध्येही सदर कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद, नागपूरला तरतूदी अभावी निधी उपलब्ध करुन देणे शक्य झाले नाही.

(२) सन २०२०-२१ ते २०२३-२४ या ४ वर्षांच्या कालावधीमध्ये नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्ते/पूलांच्या कामांसाठी खालीलप्रमाणे निधीची कामे मंजूर करण्यात आलेली आहेत :- (रुपये लक्ष)

| अ.क्र. | योजनेचे नाव व लेखाशीर्ष | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|
| १) | रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम (३०५४-२४१९) | ८१२.१३ | ११२४.५४ | १००.०० | १८५०.०० |
| २) | सर्वसाधारण जिवायो ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण (३०५४-२२०३) | ३८००.०० | २३३४.९८ | २४.०० | ५०४.४४ |
| ३) | सर्वसाधारण जिवायो इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण (५०५४-४७११) | - | ११९५.०० | - | ६०.०० |
| ४) | आदिवासी जिवायो टीएसपी/ ओटीएसपी/ माडा (३०५४-०३६३/ ३०५४-०४०७/ ५०५४-०४०२) | ५२४.८० | ४९४.२० | ९६५.०० | ५६५.०० |
| ५) | आदिवासी राज्यस्तर ओटीएसपी (३०५४-२७२२) | - | - | ३०००.०० | - |
| ६) | नाविन्यपूर्ण योजना ३.५-४.५ % (३४५१-१८९३) | ४८७.०० | ६१.९० | ९८.८५ | १२.०० |
| ७) | मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/ पाणंद रस्ते योजना | - | - | १५४१.०० | ६७३६.०० |
| | एकूण | ५६२३.९३ | ५१३०.६२ | ५७२८.८५ | ९७२७.४४ |

तसेच यापुढेही जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील रस्ते/पूलांच्या कामांकरीता अतिवृष्टी व पूरहानी कार्यक्रम व अन्य योजनेतून निधी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात घरकुलासाठी मिळणारे अनुदान अपुरे असल्याने घरकुल लाभार्थी आर्थिक अडचणीत आल्याबाबत

**(२४) * २३०७५ श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घरांच्या बांधकामासाठी लागणाऱ्या साहित्याच्या दरात वाढ झाल्यामुळे राज्यभरात घरकुलांसाठी मिळणारे अनुदान अपुरे असून घरकुल लाभार्थी आर्थिक अडचणीत सापडले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साहित्यांच्या वाढलेल्या किंमतींमुळे दीड लाख रुपयांमध्ये घर बांधणे दुर्बल घटकांना शक्य होत नसल्याने तसेच घरकुलांचे अनुदान देताना अनेक अटींमुळे अनुदान मिळण्यास विलंब होत असल्याने संपूर्ण खर्च लाभार्थींनांच करावा लागत असल्याने लाभार्थी कर्जबाजारी होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर लाभार्थ्यांना घरकुल बांधणे अशक्य होत असल्याने अनुदानात दुप्पटीने वाढ करण्याची लोकप्रतिनिधींकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त घरकुल बांधकाम प्रक्रियेमधील जाचक अटीमुळे अनुदान मिळण्यास होणारा विलंब कमी करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

ग्रामीण गृहनिर्माण योजनेंतर्गत घरकुल मंजूर लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाच्या टप्पानिहाय लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये राज्यस्तरावरील SNA मधून अनुदान थेट जमा करण्यात येते. त्यामुळे अनुदान मिळण्यास विलंब होत नाही.

(३) हे खरे आहे.

प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत लाभार्थ्यांच्या अनुज्ञेय अनुदानात रुपये २.५० लक्ष वाढ करण्याबाबत ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे दिनांक २५/११/२०२० रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला असता, केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक ०२/१२/२०२० च्या पत्रान्वये अशी कुठलीही वाढ करता येत नाही, असे कळविले आहे. तद्नंतरही दिनांक ०१/०८/२०२२ व दिनांक २६/०२/२०२४ रोजीच्या पत्रांन्वये, केंद्र शासनास अनुदान वाढीबाबत विनंती करण्यात आली आहे. यासंदर्भात केंद्र शासनाकडून अद्याप प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.

(४) घरकुल बांधकामाचे अनुदान मिळण्यास विलंब होत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोरठण (ता.जव्हार, जि.पालघर) येथील कस्तुरबा गांधी बालिका निवासी विद्यालयास व वसतिगृहास पाणीपुरवठा करण्याबाबत

**(२५) * २३५४८ श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरठण (ता.जव्हार, जि.पालघर) येथे दुर्बल घटक व वंचित गटांतील शाळाबाह्य मुलींना शिक्षणाच्या संधी प्राप्त व्हाव्यात याकरीता सुरु केलेल्या कस्तुरबा गांधी बालिका निवासी विद्यालय व वसतिगृहात पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याने विहिरीचे दूषित पाणी प्यायल्यामुळे १५ ते १६ आदिवासी मुलींना उलट्यांचा त्रास झाल्याचे तसेच मुलींना शिक्षण सोडून पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यालय व वसतिगृहात पाणी उपलब्ध होण्यासाठी येथील शिक्षकांनी जिल्हा परिषद व पाणीपुरवठा विभागाकडे पाठपुरावा करुनही पाण्याची सोय करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, गोरठण, ता.जव्हार, जि.पालघर येथील १४ विद्यार्थिनींना दिनांक २९/०२/२०२४ रोजी पोटदुखी, संडास व उलटीचा त्रास झाल्याने, त्यांना उप जिल्हा रूग्णालय जव्हार येथे उपचाराकरीता दाखल करण्यात आले होते.

विद्यालयामध्ये शुध्द, नियमित व पुरेसा पाणीपुरवठा करण्यात येत असल्याने, विद्यालयामधील मुलींना पाण्यासाठी भटकंती करावी लागत नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

मुख्याध्यापिका, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, गोरठण, यांनी दिनांक ०४/०३/२०२४ च्या अर्जान्वये, तहसिलदार, जव्हार, यांच्याकडे पाणीपुरवठा करण्याच्या अनुषंगाने विनंती केली आहे.

(३) कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयास पाणीपुरवठा करणाऱ्या पाणी स्त्रोतांच्या पाणी नमुन्यांची दिनांक २९/०२/२०२४ रोजी तपासणी केली असता, पाण्यामध्ये Coliform आढळून आल्याने, पाणी पिण्यास अयोग्य आढळले. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी दिलेल्या निर्देशानुसार पाणी स्त्रोताच्या विहिरीमध्ये T.C.L Dosing करून एक दिवसाआड शुध्द पाणीपुरवठा करण्यात येत आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पालघर यांच्या दिनांक १३/०३/२०२४ रोजीच्या अहवालानुसार पाणी पिण्यास योग्य असल्याचे आढळून आले आहे. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, गोरठण करीता जल जीवन मिशन अंतर्गत नवीन नळ पाणीपुरवठा योजना मंजूर असून सदर योजनेचे काम डिसेंबर, २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाळुज (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील औद्योगिक वसाहतीतील कंपनीत लागलेल्या आगीमध्ये कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत

**(२६) * २३४०३ श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळूज (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील सी सेक्टर, प्लॉट नंबर २१६ मध्ये औद्योगिक वसाहतीमधील हातमोजे बनविणाऱ्या सनशाईन एंटरप्रायजेस या कंपनीत लागलेल्या आगीत ६ कामगारांचा मृत्यू झाला असून पाच वर्षीय चिमुकलीसह ११ जण भाजून जखमी झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत व जखमींना योग्य उपचाराकरीता आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सनशाईन एंटरप्रायजेस, सी-२१६, एमआयडीसी वाळुज, छ.संभाजीनगर या आस्थापनेत दिनांक ३१/१२/२०२३ रोजी रात्री ०१.३० च्या सुमारास आग लागुन ०६ कामगारांच्या मृत्यू झाला. तसेच ठेकेदार स्वतः, त्याची पत्नी व दोन लहान मुलासह इतर ०७ कामगार अशाप्रकारे एकूण ११ व्यक्ती सुखरूप बाहेर पडल्या.

(२) सदर कारखान्यात २० पेक्षा कमी कामगार असल्याने सदर आस्थापनेस कारखाने अधिनियम, १९४८ मधील तरतुदी लागू नाहीत. तथापि, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत सदर आस्थापनेची तपासणी करण्यात आलेली आहे.

सदर दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना व जखमींना आर्थिक मदत देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत मा.नुकसान भरपाई आयुक्त तथा कामगार न्यायालय, छत्रपती संभाजीनगर यांना सुचना देण्यात आली आहे. मा.कामगार न्यायालयात सद्या सदर दावा प्रलंबित असून मृतांचे वारसदार निश्चित करण्याची कार्यवाही मा.नुकसान भरपाई आयुक्त तथा कामगार न्यायालय यांचेकडुन सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बाळापूर (जि.अकोला) तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी व केंद्र प्रमुखांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२७) * २३६९९ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळापूर (जि.अकोला) तालुक्यात जिल्हा परिषदेच्या १०३ प्राथमिक शाळा, बाळापुर व कान्हेरी गवळी येथे दोन विद्यालये तसेच तालुक्यात ३५० च्या आसपास शिक्षक असून जिल्हा परिषदांच्या या शाळांवर नियंत्रण ठेवण्यासाठी व शिक्षण ग्रामस्तरावर पोहोचविण्यासाठी शिक्षण विभागातील महत्वाची व आवश्यक असलेली गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी तसेच केंद्र प्रमुखांची पदे मागील दहा ते अकरा वर्षांपासून रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त राहण्यामागील कारणे काय असून बाळापुर तालुक्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या शेतकरी, शेतमजुरांच्या मुलांच्या भवितव्याच्या दृष्टीने सदरील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे. बाळापूर (जि.अकोला) तालुक्यात जिल्हा परिषदे अंतर्गत गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी तसेच केंद्रप्रमुखांची पदे रिक्त आहेत. तथापि, सदर पदांचा कार्यभार अन्य अधिकारी/कर्मचारी यांच्याकडे सोपविण्यात आले आहे.
(२) जिल्हा परिषद अकोला अंतर्गत एकूण ०७ पंचायत समिती असून एकूण ०७ गटशिक्षणाधिकारी पदे मंजूर आहेत. ०१ पद भरलेले आहे. उर्वरित ०६ रिक्त पदांचा तात्पुरता प्रभार अधीक्षक, शालेय पोषण आहार तसेच विस्तार अधिकारी (शिक्षण) यांचेकडे देण्यात आला असून सुरळीत कामकाज सुरु आहे.

जिल्हा परिषद अकोला अंतर्गत विस्तार अधिकारी (शिक्षण) पदे पदोन्नतीने सन २०२२ मध्ये भरण्यात आले आहे.

शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या दिनांक १/१२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये केंद्रप्रमुखाची ५० टक्के पदे पदोन्नतीने व ५० टक्के पदे मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेव्दारे भरण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार केंद्रप्रमुख पदाच्या सेवाप्रवेशासंदर्भात महाराष्ट्र जिल्हापरिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच सदर सुधारीत सेवा प्रवेश नियम अधिसूचित होईपर्यंत केंद्रप्रमुख पदोन्नतीसंदर्भात शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १/१२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील सुधारीत तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना ग्रामविकास विभागाच्या दिनांक २७/१२/२०२३ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत.

केंद्र प्रमुख पदासंदर्भात धोरण निश्चिती प्रमाणे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील केंद्र प्रमुख पदाच्या सेवा नियमात आवश्यक त्या सुधारणा करण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु आहे.

जिल्हा परिषद अकोला अंतर्गत बाळापूर तसेच इतर सर्व तालुक्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या शेतकरी, शेतमजुरांच्या मुलांच्या भवितव्याच्या दृष्टीने सदरील केंद्रप्रमुख पदाच्या रिक्त पदी केंद्रीय शाळेतील उच्चश्रेणी मुख्याध्यापक यांचेकडे त्या केंद्राच्या केंद्रप्रमुख पदाचा अतिरिक्त प्रभार सोपविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खारेपाट (ता.पेण, जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीकरीता घेतलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत करणेबाबत

**(२८) * २३००२ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारेपाट (ता.पेण, जि.रायगड) तसेच खालापूर व माणगाव या तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या सुमारे हजारो एकर जमिनी २० वर्षांपुर्वी उद्योगपतींनी खरेदी केल्या असून या ठिकाणी अद्याप एकही प्रकल्प सुरू न झाल्याने येथे रोजगार निर्मिती होत नसून या भागाचा विकास होत नसल्याचे दिनांक १२ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उद्योगांकरीता खरेदी केलेल्या जमिनीवर १५ वर्षांमध्ये एकही प्रकल्प उभा न राहिल्यास कायद्यानुसार शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांना परत देण्यात येतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू कायद्याच्या आधारे रायगड जिल्ह्यातील दीर्घकाळ औद्योगिक प्रकल्प प्रत्यक्षात साकारण्यात न आलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

पेण तालुक्यात मऔवि महामंडळाने औद्योगिक वसाहतीकरीता जमिनी घेतलेल्या नाहीत. तसेच खालापूर तालुक्यात मऔवि महामंडळामार्फत खालापूर टप्पा क्र.३ व विस्तारीत खालापूर टप्पा क्र.३ करीता भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. भूसंपादनास वाढीव दराची मागणी असल्याकारणाने भूसंपादनास विलंब होत असून त्यामुळे मऔवि महामंडळास खालापूर तालुक्यात जमिनीचे औद्योगिक कारणासाठी मोठे क्षेत्र प्राप्त झालेले नाही.

दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर अंतर्गत माणगांव तालुक्यात सन २०१४ पासून भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. पहिल्या टप्प्यातील एकूण ६३२७ हे.आर क्षेत्रापैकी ५२०० हे.आर.क्षेत्राचा ताबा महामंडळास प्राप्त झालेला आहे. सदर औद्योगिक क्षेत्राकरीता पायाभूत सुविधा तयार करण्याचे काम मऔवि महामंडळाकडून सुरु आहे.
(२) व (३) मऔवि महामंडळाकडे खालापूर व माणगांव तालुक्यात १५ वर्षापासून ताबा प्राप्त होवून वाटपास जमिनी शिल्लक नसल्यामुळे सदर जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातीत ८९ गावांतील सांडपाण्यामुळे होणाऱ्या पंचगंगा नदीतील प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२९) * २३६०८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदीच्या प्रदुषणाला कारणीभूत असणाऱ्या ८९ गावांतील सांडपाणी रोखण्यासाठी सविस्तर सर्वेक्षण करुन या गावांमध्ये शोषखड्डे काढणे, बांध घालणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करणे यासारख्या विविध उपाययोजना राबविण्यासाठी रुपये २५२ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील प्रस्ताव जिल्हा परिषदेने पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडे सादर केला होता, परंतु सदरील प्रस्ताव फेटाळण्यात आला असल्याने सदर पंचगंगा नदीचे प्रदूषण रोखण्याबाबतचा प्रश्न प्रलंबित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय हे अंशत: खरे आहे, तथापि, सद्य:स्थितीत जिल्हा परिषदे मार्फत ८९ गावातील सांडपाण्याचा शेतीकरीता पुर्नवापर, बंधारे घालून सांडपाणी अडवून स्थिरीकरण करणे, सार्वजनिक शोषखड्डे इत्यादी द्वारे तात्पूरत्या उपाययोजना करण्यात येत आहेत.
(३) कायमस्वरूपी उपाययोजनेसाठी पाणीपुरवठा विभागाने सूचित केल्या प्रमाणे अतिरिक्त निधीसाठी या विभागास व पर्यावरण विभागास जिल्हा परिषदे कडून नव्याने प्रस्ताव तयार करून सादर करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विरार (प.) येथील सांडपाणी पुनर्प्रक्रीया केंद्रात साफसफाई करताना ४ कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत

**(३०) * २३०१० श्री.कपिल पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विरार (प.) येथील ग्लोबल सिटीतील पॉलिकॉन एन्व्हायरो इंजिनिअर्स प्रा. लि. (Pollution Control Project) कंपनीतील मलनिस्सारण केंद्र २ मध्ये खाजगी सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्रात (एसटीपी प्लांट) साफसफाई करताना ४ कामगारांचा गुदमरून मृत्यू झाल्याची दुर्घटना दिनांक ९ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीने रिसायकल टँकमध्ये चॉकअप काढणाऱ्या कर्मचाऱ्यांना पुरेशी सुरक्षात्मक साधन-सामुग्री पुरविली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दुर्घटनेतील मृत कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
ग्लोबल सिटी विरार (पश्चिम) ता.वसई जि.पालघर येथील सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्रात पुरेशी सुरक्षा न पुरविल्यामुळे दिनांक ०९/०४/२०२५ रोजी झालेल्या दुर्घटनेत १) शुभम सुर्यकांत पारकर, २) अमोल अनंत घाटाळ, ३) निखिल अनंत घाटाळ, व ४) सागर सुनिल तांदळेकर हे चार कामगार मयत झालेले आहेत.
(३) कंपनी व्यवस्थापनाने कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ नुसार ०४ मयत कामगारांच्या वारसांना देय असलेली नुकसान भरपाईची रक्कम रुपये ६२,५५,६७५/- दिनांक ०३/०५/२०२४ रोजी मा.कामगार न्यायालयात जमा केली आहे. तथापि, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील दिनांक १२/१२/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार, मृत कामगारांच्या वारसांना प्रत्येकी रुपये ३० लाख नुकसानभरपाई प्रदान करण्याबाबत जिल्हाधिकारी, पालघर कार्यालयातर्फे कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच कंपनीचे मालकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

## पालघर जिल्ह्यातील औद्योगिक कारखान्यांमध्ये स्थानिक तरुणांना प्राधान्याने रोजगार देण्याबाबत

**(३१) * २३०२३ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या जिल्हा कौशल्य विकास रोजगार आणि उद्योजकता आयुक्तालय, मुंबई अंतर्गत असलेल्या पालघर विभागामध्ये ६५ हजार ९१४ बेरोजगार तरुणांनी सन २०२३ मध्ये वा त्यासुमारास नोकर भरतीकरीता नोंदणी केली असून त्यापैकी केवळ २९७ बेरोजगार तरूणांना रोजगार मिळाला असल्याची बाब दिनांक १२ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित ६५ हजार ६१७ नोकर भरतीकरीता नोंदणी केलेले स्थानिक बेरोजगार तरुण अद्यापही नोकरीच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्ह्यात स्थानिकांच्या जमिनीवर उभारण्यात आलेल्या औद्योगिक कारखान्यांमध्ये काम करण्यासाठी स्थानिकांना प्राधान्य दिले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने पालघर जिल्ह्यातील स्थानिक बेरोजगार तरुणांना औद्योगिक कारखान्यांमध्ये प्राधान्याने रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे अंशत: खरे आहे.

पालघर जिल्ह्यात माहे जानेवारी ते डिसेंबर, २०२३ या कालावधीत एकूण ४,७१९ उमेदवारांनी नोंदणी केली असून त्यापैकी २९७ उमेदवारांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

(२) हे खरे नाही.

विभागाच्या www.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर नोकरीइच्छुक उमेदवारांची नोंदणी केली जाते. त्यानुसार पालघर जिल्ह्यात डिसेंबर, २०२३ पर्यंत नोंदणीपटावर एकूण ६५,९१४ इतक्या उमेदवारांची नोंदणी झाल्याचे दिसून येते. मात्र, सदर नोंदणीची आकडेवारी सन १९८१ पासूनची असून त्यात विभाजनपूर्व ठाणे जिल्ह्यातील परंतु सद्य:स्थितीत पालघर जिल्ह्यात समाविष्ट असलेल्या उमेदवारांचा समावेश आहे. नोंदणीकृत उमेदवारांना रोजगार उपलब्ध झाला तरी, रोजगारांच्या अधिक चांगल्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने उमेदवारांची नोंदणी तशीच पुढे सुरु राहते.

(३) हे खरे नाही.

(४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १७/११/२००८ च्या शासन निर्णयान्वये सर्व सुक्ष्म, लघु, मध्यम, मोठ्या व विशाल औद्योगिक उपक्रमांतील नोकऱ्यांमध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत किमान ५० % व पर्यवेक्षकीयसहीत इतर श्रेणीत किमान ८०% स्थानिक उमेदवारांना प्राधान्याने घेण्याबाबत कार्यपध्दती ठरविण्यात आली आहे. त्यानुसार ज्या औद्योगिक घटकांनी विविध प्रोत्साहने व सवलतींचा लाभ घेतला आहे, अशा सर्व घटकांनी विहीत प्रपत्रात लेखी हमीपत्र संबंधित अभिकरण संस्थेकडे सादर करावे, असे निर्देश दिले आहेत. तसेच, प्रत्येक औद्योगिक घटकाने उत्पादन सुरु केल्यानंतर वार्षिक नियतकालिक अहवाल विहीत प्रपत्रात संबंधित उद्योग केंद्राकडे सादर करणे आवश्यक आहे.

उद्योग सहसंचालक यांच्या अहवालानुसार पालघर जिल्ह्यातील उद्योगांमध्ये स्थानिक लोकांच्या रोजगाराचे प्रमाणे ८५ ते ८८ % असल्याचे दिसून येते.

उपरोक्त धोरणाचा नियमित आढावा मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शासकीय रक्तपेढयांच्या रक्त संकलनाच्या क्षमतेमध्ये वाढ करण्याबाबत**

**(३२) * २३७६६ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सन २०२३-२४ या एका वर्षाच्या कालावधीमध्ये राज्यातील शासकीय व खाजगी रक्त पेढ्यांमधून संकलित करण्यात आलेल्या रक्तांपैकी केवळ १० टक्के रक्त शासकीय रक्त पेढ्यांना प्राप्त झाल्याची व बहुतांशी शासकीय रक्तपेढ्या या रक्ताचा अपुरा साठा, रक्त संकलनासाठी अपुऱ्या सुविधा, इ. विविध कारणास्तव बंद होण्याच्या माार्गावर असल्याची बाब देखील माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय रक्तपेढ्यांमधून रुग्णाला मोफत रक्त उपलब्ध होत असताना खाजगी रक्तपेढीमार्फत रक्ताच्या प्रती पिशवीकरीता अंदाजे रुपये १,५५०/- इतके अथवा त्यापेक्षा अधिक शुल्क आकारण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय व खाजगी रक्त पेढ्यांमार्फत संकलित करण्यात येणाऱ्या रक्त संकलनाच्या आकडेवारीनुसार शासकीय रक्त पेढ्यांची रक्त संकलनाची आकडेवारी देखील कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कालावधीत संकलित करण्यात आलेला रक्ताचा तपशिल काय असून राज्यात सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या शासकीय रक्तपेंढयाच्या संख्येबाबत तपशिल काय आहे,

(५) असल्यास, शासकीय रक्तपेढ्यांची रक्त संकलन करण्याची क्षमता वाढवण्यासाठी तसेच रक्तदान शिबिरांमधून शासकीय रक्तपेढ्यांना मिळणाऱ्या रक्ताच्या कोट्यांमध्ये वाढ करण्याबाबत व रक्त साठवणुकीकरीता आवश्यक प्रगत सुविधा व तंत्रज्ञान उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही,

राज्यात सन २०२३-२४ मध्ये शासकीय रक्तकेंद्रामध्ये अशासकीय रक्तकेंद्राच्या तुलनेत १८.८४% रक्त संकलन झाले आहे. सद्य:स्थितीत राज्यामध्ये शासकीय व महानगरपालिका संचलित एकूण ७६ रक्तकेंद्रे कार्यरत आहेत. तसेच ३०२ अशासकीय रक्तकेंद्रे कार्यरत आहेत. सदर शासकीय / महानगरपालिका संचलित रक्तकेंद्रामध्ये सन २०२३-२४ या कालावधीमध्ये एकूण ३,९१,७७४ युनीट व अशासकीय रक्तकेंद्रामध्ये १६,८७,४२४ युनीट रक्त संकलन झाले. अशासकीय रक्तकेंद्राची संख्या ही शासकीय रक्तकेंद्रापेक्षा जास्त आहे. त्यामुळे ही तफावत दिसून येते.

(२) हे अंशत: खरे आहे,

सद्य:स्थितीत राज्यात एकूण ३७८ रक्तकेंद्र कार्यरत आहेत. राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद (NBTC), नवी दिल्ली यांचेमार्फत शासकीय व अशासकीय रक्तकेंद्रांचे रक्त व रक्तघटक यांचे प्रक्रिया शुल्क निश्चित करण्यात येते. त्यानुसार शा.नि.क्र. सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक ०८/०२/२०२३ प्रमाणे सद्य:स्थितीत शासकीय रक्तकेंद्रात प्रक्रिया शुल्काचे दर रुपये ११००/- प्रती बॅग असून अशासकीय रक्तकेंद्रांसाठी रुपये १५५०/- प्रती बॅग आहे व सदर दर शासकीय व अशासकीय रक्तकेंद्रसाठी निर्धारित दर आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागाचा शा.नि.दिनांक ११. १२.२०२० नुसार सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत रक्तकेंद्रामधून शासकीय रुग्णालयात आंतररुग्णास गरजेनुसार विनामुल्य रक्त पुरवठा करण्यात येतो.

(३) हे खरे आहे,

तथापि, अशासकीय रक्तकेंद्राच्या तुलनेत शासकीय व महानगरपालिका संचलित रक्तकेंद्राची संख्या कमी असल्यामुळे ही तफावत आढळून येते.

(४) राज्यात शासकीय व महानगरपालिका संचलित एकूण ७६ रक्तकेंद्र कार्यरत आहेत. सदर रक्तकेंद्रामार्फत सन २०२३-२४ या कालावधीत एकूण ३,९१,७७४ युनीट रक्तसंकलन करण्यात आले आहे.

(५) शासकीय रक्तकेंद्र हे गरजे प्रमाणे स्वैच्छिक रक्तदान शिबीरे आयोजीत करतात व रक्त संकलन करतात. रक्तकेंद्रातील अतिरिक्त साठा ज्या रक्तकेंद्रामध्ये रक्ताची गरज आहे, त्या रक्तकेंद्रात आवश्यकतेनुसार स्थंलातरित करण्यात येतो व रक्ताची गरज भागविण्यात येते.

धार्मिक, सामाजिक किंवा राजकीय संस्था रक्तदान शिबीरे आयोजीत करतात व त्यासाठी शासकीय रक्तकेंद्राना प्राधान्याने रक्तसंकलनासाठी बोलवण्यात येते. शासकीय रक्तकेंद्रामध्ये गरजेप्रमाणे संबंधित विभागामार्फत म्हणजे सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकिय शिक्षण विभाग व महानगरपालिका प्राधिकारणामार्फत सुविधा व आवश्यक तंत्रज्ञान उपलब्ध करुन देण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत रुग्णवाहिका खरेदीत आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३३) * २३३७० श्री.अरुण लाड, श्री.सचिन अहिर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागाला रुग्णवाहिका पुरविण्यासाठी काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत केंद्रीय दक्षता आयोगाने जारी केलेल्या नियमांचे व मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करुन निविदा प्रक्रिया राबविल्याने आरोग्य विभागात सुमारे साडेसहा हजार कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णवाहिका खरेदीचे कंत्राट प्रथमत: सुमित व तद्नंतर शासनाने काळ्या यादीत टाकलेल्या बीव्हीजी कंपनी अशा या दोन कंपन्यांना देऊन सदर आर्थिक गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यासुमारास रुग्णवाहिका खरेदी आणि ती सेवा चालविण्यासाठीचा अध्यादेश काढल्याने, या सेवेसाठी पिंपरी-चिंचवड येथे स्वच्छता सेवा पुरविणाऱ्या एका कंपनीला या सेवेचा आराखडा तयार करण्याचे काम देण्यात आले, मात्र ऐनवेळी या अध्यादेशात दिनांक १५ मार्च, २०२४ ला दुरुस्ती करून एका विशिष्ट कंपनीला काम देण्याचे निश्चित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कंपनीला कोणताही रुग्णवाहिका आणि सेवा पुरविण्याचा अनुभव नसताना काम दिल्याने आर्थिक नुकसानीसह रुग्णांचेही आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सार्वजनिक आरोग्य विभागातील रुग्णवाहिका खरेदी आणि सेवा पुरविण्याच्या प्रक्रियेत आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

निविदेमध्ये सहभागी झालेल्या व पात्र ठरलेल्या संयुक्त निविदाकार (मे. सुमित फॅसिलिटीस लिमिटेड, मे. बीव्हीजी इंडिया लिमिटेड व मे. एसएसजी ट्रान्सपोर्टे सॅनिटेरीयो, एस एल) यांना नियमांनुसार कंत्राट देण्यात आलेले आहे.

(३) हे खरे नाही.

निविदा प्रकिया राबवून सेवा पुरवठाधारक निवडण्यात आला आहे.

(४) हे खरे नाही.

निविदेमधील अनुभवाच्या अटी व शर्ती नुसार पात्र ठरलेल्या संयुक्त निविदाकार (मे. सुमित फॅसिलिटीस लिमिटेड, मे. बीव्हीजी इंडिया लिमिटेड व मे. एसएसजी ट्रान्सपोर्टे सॅनिटेरीयो, एस एल) यांना कंत्राट देण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील १९ गावे व पाड्यांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाल्याबाबत

**(३४) * २३६५३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारच्या जल जीवन मिशन अंतर्गत ‘हर घर नल से जल’ योजनेच्या माध्यमातून शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील ७० ग्रामपंचायतींमध्ये १८९ नळ पाणीपुरवठा योजनेसाठी शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून मंजुरी दिलेल्या योजनांपैकी अवघ्या ०७ योजना पूर्ण झाल्या असून, १८२ योजना अजूनही प्रलंबित असल्यामुळे तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात भातसा, तानसा, अप्पर वैतरणा, मध्य वैतरणा ही मुंबई, ठाणे या दोन मोठ्या शहरांना पाणीपुरवठा करणारी धरणे असून, देखील शहापूर तालुक्यात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असल्याने सदर तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी इगतपुरी तालुक्यातील भावली धरणातून पाणीपुरवठा करणारी तीनशे कोटी रुपयांची जलजीवन मिशन अंतर्गत पाणी योजना राबविण्यात येत असून सदर योजनेमधून काही घरात पाणी पोहचले नसल्याने पाणीटंचाईच्या झळाने त्रस्त झालेल्या आदिवासी माता-भगिनींनी वेळूक ग्रामपंचायत कार्यालयावर नुकताच श्रमजीवी संघटनेच्या माध्यमातुन हंडा मोर्चा काढून आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहापूर तालुक्यातील २५ गावे व ११८ आदिवासी पाड्यांत तीव्र पाणी टंचाई भासत असून ढाकणे, वेळूक कळगोंडे, दहिगांव आणि लाहे या गावातील तसेच आणि १९ पाड्यांमधील ग्रामस्थांना डबक्यातील पाणी प्यावे लागत असल्याने पंचायत समितीने तहसिलदार कार्यालयाकडे टँकरने पाणीपुरवठा करण्याची मागणीचा प्रस्ताव पाठविला असून, सदर प्रस्तावाला अद्याप मंजुरी मिळाली नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील तीव्र पाणीटंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा करण्याबाबत तसेच नळ पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषदेमार्फत शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात एकूण २१२ योजना प्रस्तावित आहेत. त्यापैकी ३१ योजनांची कामे भौतिकदृष्टया पूर्ण झाली असून, उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत. सदरची कामे डिसेंबर, २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) होय, हे खरे आहे.

जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील ९७ गावांसाठी भावली धरण उद्भव घेऊन प्रादेशिक पाणीपुरवठा योजना मंजूर आहे. योजनेचे कार्यारंभ आदेश दिनांक ०४/०८/२०२२ रोजी देण्यात आले असून, योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. योजनेचे काम पूर्ण करण्याचा कालावधी २४ महिने व त्यानंतर १२ महिने देखभाल दुरुस्तीचा कालावधी असा एकूण ३६ महिन्याचा कालावधी आहे. सद्य:स्थितीत योजनेची भौतिक प्रगती ५७% व आर्थिक प्रगती ५१% इतकी आहे.

(३) शहापूर तालुक्यातील ग्रामपंचायतीचे टँकरने पाणीपुरवठा करणेसाठी मागणी प्रस्ताव पंचायत समिती कार्यालयास प्राप्त होताच त्या गांव पाड्यांना आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेऊन टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत ४२ टँकरव्दारे ४१ गांवे व १५१ पाडे अशा एकूण १९२ गांव / पाड्यांना टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(४) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत शहापूर तालुक्यात भावली धरणावरुन गुरुत्वकर्षणाव्दारे नळ पाणीपुरवठा योजना प्रस्तावित करण्यात आली आहे. सदर योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर योजनेचे काम डिसेंबर, २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून, योजनेचे काम पूर्ण होऊन कार्यान्वित झाल्यानंतर टँकरग्रस्त गाव / पाडे यांना त्वरीत पाणीपुरवठा सुरु करण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बेरोजगारांना रोजगार भत्ता सुरू करण्याबाबत

**(३५) * २३८२५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील काही राज्यांमध्ये बेरोजगार तरुणांसाठी दरमहा ३ हजार रुपयांचा रोजगार भत्ता सुरू करण्यात आला असून याच धर्तीवर आपल्या राज्यातील बेरोजगारांना रोजगार भत्ता सुरु करण्यासंदर्भात अहवाल मागवून समितीची स्थापना करण्याची मागणी लोकप्रतिनिधींकडून माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान केली आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सुशिक्षित तरुणांना त्यांच्या कौशल्याप्रमाणे आणि शिक्षणाप्रमाणे रोजगार उपलब्ध नसल्यामुळे बेरोजगार तरुणांना आर्थिकदृष्ट्या सक्षम तसेच तरुणांचा सामाजिक व आर्थिक विकास करुन रोजगार निर्मितीला चालना देणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात रोजगार भत्ता सुरु करुन बेरोजगारांना नोकरी मिळेपर्यंत सदरहू भत्ता सुरु ठेवण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) कार्यालयीन अभिलेखे तपासले असता अशा प्रकारचे निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.

(२) व (३) राज्यातील युवकांना कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाच्या अधिपत्याखाली असलेल्या महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत. महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत “स्टार्ट अप” च्या माध्यमातून युवकांना नवीन उद्योग निर्मितीस चालना देवून रोजगार उपलब्ध करण्यात येतात. तसेच, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी व महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेंतर्गत प्रशिक्षण व दरमहा विद्यावेतन देण्यात येते.

रोजगार भत्ता देण्याऐवजी उमेदवारांना कौशल्य प्रशिक्षणासह रोजगारास सक्षम करुन त्यांना जागतिक बाजारपेठेत रोजगार उपलब्ध होईल, याकरीता शासनामार्फत उपरोक्त कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हाफकिन बायोफार्मामार्फत तयार करण्यात आलेल्या औषधांचा साठा खरेदी अभावी पडून राहिल्याबाबत

**(३६) * २३१७४ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या अनेक वर्षापासून शासकीय रुग्णालयात हाफकिन बायोफार्मामार्फत औषधांचा पुरवठा करण्यात येत होता, मात्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण स्थापन झाल्यानंतर सदर खरेदी बंद करण्यात आली असून राज्य शासनाच्या आणि पालिका रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा असताना राज्याच्या हाफकिन बायोफार्माने तयार केलेली १५ कोटींची औषधे शासनाने खरेदी न केल्यामुळे पडून असल्याची बाब माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने हाफकिन बायोफर्मामार्फत औषधे खरेदीकरीता शासनाकडून कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

शासनाच्या दिनांक ०१/१२/२०१६ रोजीच्या खरेदी धोरणातील तरतुदीनुसार हाफकिन बायोफार्मा, मुंबई यांनी स्व-उत्पादित केलेल्या औषधांपैकी त्यांच्याकडून सन २०२३-२४ मध्ये उत्पादित होणाऱ्या व त्यानुषंगाने दिनांक ०६/०६/२०२३ रोजी दर निर्धारित केलेल्या औषधांपैकी विभागांनी (सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण) प्रस्तावित केलेल्या औषधांच्या एकूण १७ (एकूण मूल्य रुपये १६.५ कोटी) बाबींकरीता हाफकिन बायोफार्मा, मुंबई यांना पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ऊसर (ता.अलिबाग जि.रायगड) येथील एचपीसीएल कंपनीमधील कामगारांना कामावरुन कमी केल्याबाबत

**(३७)** * **२३२४४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऊसर (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील एचपीसीएल या कंपनीमध्ये हँडलिंग फिटर, सिक्युरिटी अशा विविध पदांवर गत दहा ते बारा वर्षे कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना दिनांक १ डिसेंबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान कंपनी व्यवस्थापनाने व कंत्राटदाराने कोणतीही पुर्वसूचना अथवा नोटीस न देता कामावरून कमी करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्थानिक कंत्राटी कामगारांची जमा असलेले उपदान (ग्रॅज्युइटी) किंवा इतर देणी कंपनीकडून देण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ऊसर येथील एचपीसीएल कंपनीमधून कमी करण्यात आलेल्या सर्व कामगारांना पूर्ववत कामावर घेण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) अंशत: खरे आहे

एचपीसीएल कंपनीच्या ऊसर, ता.अलिबाग या प्लांटमध्ये एलपीजी बॉटलिंगचे काम चालत असून त्याची उतराई व भराईचे काम चालते. व्यवस्थापनाने व्यवसायाच्या आवश्यकतेनुसार पाताळगंगा, जि.रायगड येथे नविन बॉटलिंग प्लांट उभारला असून दिनांक ०१/०८/२०२३ पासून ऊसर, अलिबाग येथील बॉटलिंग प्लांटमधील काही कामाचे स्थलांतर पाताळगंगा, रायगड येथे केले आहे. ऊसर येथील बॉटलिंग प्लांटमध्ये दिनांक ०१/०८/२०२३ पुर्वी २५६ कंत्राटी कामगार काम करीत होते. सदर प्लांटमधील काही काम स्थलांतरील झाल्यामुळे ऊसर येथील उत्पादन दिनांक ०१/०८/२०२३ पासून दोन शिफ्ट ऐवजी एका शिफ्टमध्ये करण्यात आले आहे. त्यामुळे दिनांक ०१/११/२०२३ पासून एका शिफ्टमध्ये ११६ कामगार कंत्राटदारामार्फत काम करीत आहेत.

(२) कंत्राटदारांना व्यवस्थापनाकडून १ ते २ वर्षाच्या कालावधीकरीता कामाचे आदेश दिले जातात. उपदान प्रदान अधिनियम, १९७२ अंतर्गत उपदान मिळण्याकरीता ५ वर्षे सलग सेवेची पात्रता आवश्यक असते. त्यामुळे उपदान प्रदान अधिनियम, १९७२ ची पात्रता सदर कंत्राटी कामगार पूर्ण करीत नसल्याने त्यांना उपदान अदा करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तसेच सदर कामगारांना नियमानुसार देय होणारा पी.एफ, ईएसआयसी (ESIC) व बोनस त्या त्या वेळी कंत्राटदाराकडून अदा करण्यात आले आहे.
(३) सदर आस्थापना ही केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून समूचित शासन हे केंद्र शासन आहे.

कंत्राटी कामगारांना कामावरुन कमी केल्यानंतर त्यांना पूर्ववत कामावर घेण्याबाबत प्रादेशिक श्रम आयुक्त यांच्याकडे कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झालेली नाही, असे उप मुख्य श्रम आयुक्त (केद्रीय), मुंबई यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## राज्यात विशेषतः ठाणे जिल्ह्यात “लेक लाडकी” योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत

**(३८) * २३३३२ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुलींचा जन्मदर वाढविणे, मुलीच्या शिक्षणास चालना देणे, मुलींचा मृत्यूदर कमी करणे, कुपोषण कमी करणे, शाळाबाह्य मुलींचे प्रमाण शुन्यावर आणणे तसेच बालविवाह रोखणे याकरीता शासनाने “माझी कन्या भाग्यश्री” योजनेत सुधारणा करून दिनांक १ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास “लेक लाडकी” योजना सुरू केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यात दिनांक १ एप्रिल, २०२३ ते जानेवारी, २०२४ पर्यंत वा त्यासुमारास ८९३९ मुलींचा जन्म झाला असून, या योजनेसाठी आतापर्यंत संबंधित विभागाकडे प्राप्त झालेल्या ११५६ मुलींच्या अर्जांपैकी ५६१ मुलींना योजनेसाठी पात्र ठरविण्यात आले असून, उर्वरित मुली अपात्र झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त अपात्र मुली पात्र करण्याकरीता तसेच "लेक लाडकी" या योजनेविषयी पुरेशा प्रमाणात जनजागृती करून ठाणे जिल्ह्यासह राज्यभरातील सर्व जिल्ह्यांतील मुलींना जास्तीत जास्त लाभ देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सदर योजनेंतर्गत ठाणे जिल्ह्यात १,५५० अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी १,३१० लाभार्थ्यांना पात्र ठरविण्यात आले आहे. उर्वरित २४० लाभार्थ्यांचे अर्ज त्यांच्या अर्जातील तांत्रिक त्रुटीमुळे अपात्र ठरविण्यात आले होते. तथापि, कागदपत्रांच्या पूर्तते अंती सदर अर्ज पात्र करणेबाबत कार्यवाही सुरू आहे.

(३) लेक लाडकी या योजनेचा शुभारंभ मा.पंतप्रधान यांच्या हस्ते करण्यात आला आहे. तसेच, राज्यातील सर्व जिल्ह्यात सदर योजनेच्या प्रचार प्रसिध्दीसाठी अंगणवाडी सेविका / मदतनीस यांच्यामार्फ़त घरोघरी या योजनेची माहिती देण्यात आली आहे. सार्वजनिक ठिकाणी, ग्रामपंचायत स्तरावर, शाळा, अंगणवाडी इ. ठिकाणी योजनेची प्रचार प्रसिध्दी करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत राजभवन जवळील अरबी समुद्रात विकसित करण्यात येणारी तरंगती जेट्टी (फ्लोटेड) उभारणी रद्द करण्याबाबत

**(३९) * २३५४९ श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत राजभवन जवळील अरबी समुद्रात खाजगी फ्लोटेल उभारण्याचे प्रस्तावित असून या फ्लोटेल मध्ये प्रवाशांना प्रवासासाठी तरंगती जेट्टी (फ्लोटेड) उभारण्यासाठीची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर फ्लोटेड जेट्टी (तरंगती जेट्टी) उभारल्यास कफ परेड, कुलाबा मच्छीमार नगर येथील ४०० हून अधिक बोटींना या क्षेत्रातून मासेमारी करण्याकरीता अडथळा निर्माण होणार असल्याचे निदर्शनास आले असून सदरचा प्रकल्प रद्द करण्याची मागणी स्थानिक मच्छिमारांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समिती, कफ परेड, मुंबई यांनी दिनांक १३/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास निवेदन सादर केले आहे.
(३) सदर प्रकल्पामुळे मच्छिमार बांधवाना मासेमारी करताना अडथळा निर्माण होणार नाही याची योग्य ती खबरदारी घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये पाणीटंचाई निर्माण झाल्याबाबत

**(४०) * २३७७४ श्री.राजेश राठोड, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तीव्र स्वरुपाची पाणीटंचाई जाणवत असल्याने सुमारे १४५२ गावांमध्ये १८५८ टँकरद्वारे पाणीपुरवठा होत असून मराठवाड्यात १४ दिवसांनी पाणी येत असल्याचे तसेच मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील सर्वच दुष्काळी तालुक्यांतील महिलांना हंडाभर पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वर्धा जिल्ह्यामध्ये उन्हाळ्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण होत असून जिल्ह्यातील ३८८ गावांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात दरवर्षी होत असलेली पाणीटंचाई दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक ०५/०४/२०२४ रोजी राज्यामध्ये १४५२ गावे व ३३०१ वाड्यांमध्ये १८५८ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे. दिनांक ३१/०५/२०२४ रोजी राज्यामध्ये ३१३० गावे व ७९७९ वाड्यांमध्ये ३८१६ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.
(२) वर्धा जिल्ह्यामध्ये एकूण ३८९ गावांकरीता संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला असून आराखड्यामधील समाविष्ट उपाययोजनांची आवश्यकतेनुसार अंमलबजावणी करण्यात येत आहे. सद्यःस्थितीत वर्धा जिल्ह्यात एकही टँकर सुरु नाही.
(३) राज्यात दरवर्षी होत असलेली पाणी टंचाई दूर करण्यासाठी केंद्र शासन व राज्यशासनाद्वारे जल जिवन मिशन कार्यक्रमातंर्गत ५५ लिटर दरडोई दरदिवशी पाणी उपलब्ध करून देण्याकरीता नळ पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आल्या आहेत. तसेच, जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरुन पाणी टंचाई निवारणार्थ टंचाई कृती आराखड्यानुसार विंधन विहिरी/ कुपनलिका घेणे, नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे, तात्पुरत्या पूरक नळ योजना घेणे, टँकरने/ बैलगाडीने पाणीपुरवठा करणे, खाजगी विहीर अधिग्रहण करणे, विहीर खोल करणे/ गाळ काढणे, बुडक्या घेणे, इ. तात्पुरत्या व तातडीच्या उपाययोजना राबविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली व पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील आरोग्य विभागाला शववाहिका उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४१) * २३६६४ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाकडून प्रत्येक जिल्ह्यात शववाहिनी उपलब्ध करुन देण्याची घोषणा करण्यात आली असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे ग्रामीण भागातील मृतांच्या नातेवाईकांना मृतदेह घरी नेण्याचे सोयीचे होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात हिंगोली येथील स्थानिक आरोग्य विभागाला अद्याप एकही शववाहिनी मिळाली नाही तसेच पालघर जिल्ह्याला अद्यापपर्यंत एकही शववाहिनी मिळाली नसल्याची बाब दिनांक २१ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी हिंगोली, पालघर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याला शववाहिका उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.

विधानसभा सभागृहात जून, २०२३ मध्ये ही बाब निदर्शनास आली होती. तसेच मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली राजभवन, मुंबई येथे दिनांक २४/०७/२०२३ व दिनांक ३१/०७/२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाद्वारे राज्यामध्ये राबविण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या तसेच केंद्र शासनाच्या पुरस्कृत योजनांचा आढावा घेण्यात आला. त्यानुसार ग्रामीण भागातील मृतदेहाच्या वाहतूकीकरीता प्रत्येक जिल्ह्यामध्ये शववाहिका उपलब्ध करुन देणेबाबत कार्यवाही करावी असे निर्देशित केलेले होते.
(२) होय.
(३) होय.

मा.राज्यपाल महोदयांनी निर्देशित केल्याप्रमाणे प्रत्येक जिल्हास्तरावर १ याप्रमाणे एकूण ३६ शववाहिका वाहनांच्या खरेदीसाठी सन २०२३-२४ मध्ये ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. निविदेतील प्राप्त दर आणि मंजूर अनुदानाच्या मर्यादेत ३२ नग शववाहिकेसाठी दिनांक १६/०३/२०२४ रोजी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेले होते. सन २०२३-२४ मध्ये प्राप्त अपुरे अनुदान व साहित्य पुरवठ्यासाठी असलेला अत्यल्प कालावधी यामुळे माहे मार्च २०२४ अखेर अखर्चित अनुदान समर्पित झालेले आहे.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ३२ शववाहिका खरेदीसाठी आवश्यक अनुदान पुरक मागणीद्वारे उपलब्ध होण्यासाठी दिनांक ०८/०५/२०२४ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. वाहने ताब्यात मिळाल्यानंतर हिंगोली व पालघर जिल्ह्यासह इतर जिल्हा परिषदांना शववाहिका वाटप करण्यात येईल.
(४) मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांनी आश्वासित केल्यानुसार राज्यातील प्रत्येक तालुक्यात शववाहिका उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीकोनातून कार्यवाही सुरु केलेली असून हिंगोली व पालघर जिल्ह्यासह राज्यातील इतर जिल्हा परिषद अंतर्गत प्रत्येक तालुक्यात शववाहिका उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोरिवली (पश्चिम) येथील निर्माणाधीन असलेल्या इमारतीमध्ये झालेल्या दुर्घटनेत कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत

**(४२) * २३०२५ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली (पश्चिम) येथील सोनीवाडी परिसरातील कल्पना चावला चौकात बांधकाम सुरू असलेल्या 'सोनी आर्केड' या इमारतीच्या बांबूची परांची कोसळून झालेल्या दुर्घटनेत तीन कामगारांचा मृत्यू आणि एक कामगार गंभीर जखमी झाल्याबाबतची बाब दिनांक १२ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामगांराना काम करण्यासाठी सुरक्षिततेची कोणतीही साधनसामुग्री कंत्राटदाराकडून किंवा विकासकाकडून पुरविण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या विकासक, कंत्राटदार आणि अन्य दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली तसेच दुर्घटनेत मृत पावलेल्या कामगारांच्या नातेवाईकांना तसेच जखमी झालेल्या कामगाराला आर्थिक नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर अपघाताच्या ठिकाणी निरीक्षक तथा क्षेत्रिय सरकारी कामगार अधिकारी यांनी दिनांक १८/०३/२०२४ रोजी निरीक्षण भेट देऊन चौकशी केली असून किमान वेतन अधिनियम, १९४८, वेतन प्रदान अधिनियम, १९३६ कंत्राटी कामगार अधिनियम १९७०, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत मुख्य मालक व कंत्राटदार यांच्याविरुध्द निरिक्षण शेरे पारित केले आहे.

तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या नियम २६३ अंतर्गत दिनांक २२/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये इमारतीच्या बांधकामास कामबंद/मनाई आदेश पारित करण्यात आलेले आहेत. मे. सोनी ॲण्ड असोसिएट या बांधकाम साईटवरील झालेल्या अपघाताशी संबंधित कंत्राटदार/साईट इंजिनियर यांचेविरुध्द अनुक्रमे भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत कलम ३०४-ऐ, कलम ३३८ अन्वये गुन्हा (FIR) क्र. ०१७६/२०२४, दिनांक १२/०३/२०२४ रोजी बोरिवली पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा दाखल झालेला असून मा.न्यायालयात फौजदारी खटले दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर कामाकरीता नियुक्त कामगारांसाठी घेतलेल्या विमा पॉलिसीची रक्कम मंजूर होईपर्यंत उपकंत्राटदार यांच्याकडून मयत ०३ कामगारांच्या वारसदारांना देय होणाऱ्या नुकसान भरपाई रकमेच्या अनुषंगाने रुपये ४३,२५,०००/- इतक्या रकमेची बँकगॅरेंटी मुख्य निरीक्षक तथा कामगार आयुक्त यांच्याकडे जमा करुन घेण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त प्रत्येक मयत कामगारांच्या वारसदारास तातडीची मदत म्हणून रुपये १,००,०००/- अदा करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गेवराई (जि.बीड) येथील संजयनगर भागात अवैध लिंग निदान प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(४३) * २३१७६ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) येथील संजयनगर भागात अवैध लिंग निदान प्रकरणी दिनांक ०२ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यादरम्यान गर्भवती महिला पोलिसास रुग्ण बनवून तपासणीला पाठविले असता सदर अवैध लिंग निदान करणाऱ्या अंगणवाडी सेविका आणि घरमालकाला अटक करण्यात आली असून यातील मुख्य आरोपी डॉक्टर फरार असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बकरवाडी (जि.बीड) येथील शेत मजूर महिलेचा दिनांक ०५ जुलै, २०२२ रोजी वा त्यादरम्यान गर्भपात करतेवेळी मृत्यू झाल्याप्रकरणी वरील आरोपींना अटक व नंतर जामिनावर मुक्त करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे ही खरे आहे.

(३) गेवराई (जिल्हा बीड) येथील संजय नगर भागात अवैध लिंग निदान प्रकरणी दिनांक ०२/०१/२०२४ रोजी गर्भवती महिला पोलिसास रुग्ण बनवून तपासणीला पाठविले असता सदर अवैध लिंग निदान करणाऱ्या अंगणवाडी सेविका आणि घरमालकाला अटक करण्यात आली असून त्यांचे विरुध्द व फरार डॉ. सतिष गवारे यांचे विरुध्द पोलीस स्टेशन गेवराई येथे गु.र.नं.०९/२०२४ दाखल केले आहे. सदर प्रकरणी पोलीस तपास पूर्ण झाला आहे. आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असून त्यास याचिका क्र. आर.सी.सी. ६९/२०२४ असा क्रमांक मिळाला आहे व प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. बकरवाडी (जि.बीड) येथील शेत मजुर महिलेचा दिनांक ५ जून २०२२ रोजी झालेल्या मृत्यू प्रकरणी पोलीस स्टेशन पिंपळनेर येथे गुन्हा दाखल झाला असून सदर गुन्हयाचा पोलीस तपास पूर्ण करुन सत्र न्यायालय बीड येथे आरोपींविरुध्द सेशन केस क्र. २५४/२०२२ दाखल असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तसेच विभागाकडून सदर प्रकरणातील आरोपींविरुध्द गेवराई येथील न्यायालयात पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत स्वतंत्र फिर्याद दाखल केली आहे व यास आर.सी.सी.क्र.४५२/२०२२ असा क्रमांक प्राप्त झाला असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**<br>**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**<br>**सचिव (१) (कार्यभार),**<br>**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.